K.T.S.P.Mandal's

Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar.

Department of Economics

HOD – Dr.R.S.Shirasi

Class:- F.Y.B.Com

SEM I

(New Syllabus SPPU 2019 pattern)

Subject:- Business Economics (Micro)

Subject Teacher :- Assi.Prof.Dhanapune S.V.

घटक : UNIT No 1 प्रस्ताविक आणि मूलभूत संकल्पना

उपघटक :- व्यवसायिक अर्थशास्त्र: अर्थ,स्वरूप, व्याप्ती आणि महत्व

सूक्ष्म व समग्र अर्थशास्त्र: संकल्पना

आर्थिक विश्लेषणाची साधने

मूलभूत संकल्पना: कुटुंबे,उपभोक्ता, उद्योगसंस्था, संयंत्र व उद्योग

Busi.Economics HRM

प्रकरण – १

प्रस्ताविक आणि मूलभूत संकल्पना

Introduction and Basic Concepts

1.1 व्यवसायिक अर्थशास्त्र: अर्थ,स्वरूप, व्याप्ती आणि महत्व

Meaning, Nature, Scope and Importance of Business Economics

1.2 सूक्ष्म व समग्र अर्थशास्त्र: संकल्पना

Concept of Micro and Macro Economics

1.3 सूक्ष्म व समग्र अर्थशास्त्र

Difference Between Micro and Macro Economics

1.4 आर्थिक विश्लेषणाची साधने :- अनुवर्ती / फलन संबंध, अनुसूची / तक्ते, आलेख, समीकरणे

Tools for Economic Analysis- Functional Relationship, Schedules, Graphs and Equations

1.5 मूलभूत संकल्पना: कुटुंबे,उपभोक्ता, उद्योगसंस्था, संयंत्र व

Busi.Economics HRM

उद्योग Basic Concepts: Household, Consumer, Firm, Plant and Industry

1.6 उद्योग संस्थेची आर्थिक व आर्थिकेतर ध्येय

Goals of Firms- Economic and Non- Economic

प्रास्ताविक

व्यवसायिक अर्थशास्त्र सन 1950 नंतर नव्याने विकसित झालेली अर्थशास्त्राची स्वतंत्र एक उपयोजित शाखा आहे. व्यवसायिक अर्थशास्त्र परंपरागत अर्थशास्त्राचा एक अभिन्न भाग आहे. व्यवसायाच्या वास्तवस्थितीचे स्पष्टीकरण करण्यासाठी अर्थशास्त्रातील संकल्पना, तत्वे, नियम व सिद्धांतांचा वापर करून व्यवस्थापकीय निर्णय घेणे, व्यवसायाच्या समस्या सोडविणे, व्यवसायाचे भविष्यकालीन नियोजन करणे आणि व्यावसायिक धोरणे ठरविण्यासाठी व्यवसायिक अर्थशास्त्र उपयुक्त ठरते. व्यावसायिक अर्थशास्त्रात महत्त्वाचे आर्थिक निर्णय घेण्यासाठी अर्थशास्त्रातील मागणी-पुरवठा, किंमत, उत्पन्न, खर्च, नफा आणि स्पर्धा या संकल्पनांचा वापर केला जातो. व्यावसायिक अर्थशास्त्राला व्यवस्थापकीय अर्थशास्त्र उद्योग संस्थेचे अर्थशास्त्र असे संबोधले जाते.

1.1 व्यावसायिक अर्थशास्त्र : अर्थ स्वरूप व्याप्ती व महत्त्व

1.1.1 व्यवसायिक अर्थशास्त्र : अर्थ व व्याख्या

व्यावसायिक अर्थशास्त्र चा अर्थ समजून घेण्यासाठी व्यावसायिक अर्थशास्त्राची व्याख्या व वैशिष्ट्ये समजून घेणे आवश्यक आहे. व्यवसायिक अर्थशास्त्रच्या विविध

Busi.Economics HRM

अभ्यासकांनी वेगवेगळ्या प्रकारे व्याख्या दिल्या आहेत. त्यामुळे व्यावसायिक अर्थशास्त्रची सर्वसामान्य होईल अशी एक व्याख्या देता येत नाही.

व्यावसायिक अर्थशास्त्राच्या काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे –

1)" व्यवसायिक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त असणारी व्यावहारिक शाखा म्हणजे व्यावसायिक अर्थशास्त्र होय अमूर्त सिद्धांत आणि व्यवस्थापकीय पद्धतीतील अंतर कमी करणारी अर्थशास्त्राची एक विशेष शाखा होय."

– हेन्स, मोटे, पोल

2)" व्यवसायिक परिस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी अर्थशास्त्रीय विचार प्रणालीचा वापर करणारी अर्थशास्त्राची शाखा म्हणजे व्यवसायिक अर्थशास्त्र होय."

- मेक नायर व मेरियन

3)" व्यवस्थापनाचा निर्णय घेणे आणि भावी नियोजन करण्याच्या उद्देशाने आर्थिक सिद्धांताचे व्यवसाय पद्धतीची करण्यात आलेले एकात्मीकरण म्हणजे व्यावसायिक अर्थशास्त्र होय."

- स्पेन्सर व सेलिगमन

4)" व्यवसायिक धोरणांची निश्चिती करण्यासाठी अर्थशास्त्रीय विश्लेषणाचा कसा उपयोग होतो हे दर्शवणारे शास्त्र म्हणजे व्यावसायिक अर्थशास्त्र होय."

- जोएल डीन

Busi.Economics HRM

वरील व्याख्यावरून व्यवसायिक अर्थशास्त्रची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

1. **व्यवस्थापकीय निर्णय :**

व्यवसायिक धोरणाची मांडणी करण्यासाठी व्यवस्थापकीय निर्णय घेण्यासाठी मदत करणारा व्यवसायिक अर्थशास्त्र उपयुक्त ठरणारा विषय आहे.

2. **सूक्ष्म अर्थशास्त्रावर आधारित :**

व्यवसायिक अर्थशास्त्र चे स्वरूप हे सूक्ष्मलक्षी आहे विशिष्ट उद्योग संस्थेच्या समस्या व व्यवहाराशी निगडित आहे.

3. **समग्र अर्थशास्त्रावर आधारित :**

व्यवसायिक अर्थशास्त्र मध्ये समग्र अर्थशास्त्र सुद्धा महत्त्वाचे व उपयुक्त आहे समग्र अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे उत्पादकाला चलनविषयक राजकोषीय औद्योगिक व कामगारविषयक धोरण या बाह्य घटकांचा वापर करून व्यावसायिक निर्णय घेता येतात.

4. **आर्थिक सिद्धांताचे व्यावहारिक स्वरूप :**

आर्थिक सिद्धांतात विविध नियमांची मांडणी केली जाते परंतु व्यावसायिक अर्थशास्त्रात व्यावहारिक दृष्ट्या त्या सिद्धांताचा वापर केला जातो व्यावसायिक अर्थशास्त्र चे स्वरूप हे सैद्धांतिक नसून व्यवहारिक आहे.

5. **समस्या व समस्यांची सोडवणूक :**

व्यावसायिक अर्थशास्त्र व्यवसायाची निगडित विविध प्रकारच्या बिकट समस्यांचा अभ्यास करते आणि त्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी विविध धोरणात्मक उपाययोजना सुचविते.

Busi.Economics HRM

6. **व्यवसायसंस्थेचे अर्थशास्त्र :**

उद्योगसंस्थेचा मुख्य उद्देश नफा मिळवणे हा असतो हा उद्देश साध्य करण्यासाठी उत्पादन खर्च किमान पातळीला आणण्यासाठी निर्णय घेऊन प्रभावी धोरण राबवावे लागतात व्यवसायिक अर्थशास्त्रात उद्योग संस्थेचा अभ्यास करताना बाजार संरचना किंमत व उत्पादननिश्चितीचा अभ्यास केला जातो.

1.1.2 व्यवसायिक अर्थशास्त्राचे स्वरूप व्यवसायिक अर्थशास्त्र चे स्वरूप हे परंपरागत अर्थशास्त्राच्या स्वरूप आपेक्षा भिन्न आहे व्यावसायिक अर्थशास्त्राच्या स्वरूपामध्ये पुढील बाबी समाविष्ट होतात :



व्यवसायिक अर्थशास्त्र चे स्वरूप हे परंपरागत अर्थशास्त्राच्या स्वरूप आपेक्षा भिन्न आहे व्यावसायिक अर्थशास्त्राच्या स्वरूपामध्ये पुढील बाबी समाविष्ट होतात :

1. सूक्ष्म आर्थिक स्वरूप :

व्यावसायिक अर्थशास्त्र चे स्वरूप सूक्ष्म स्वरूपाचे आहे. सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू उद्योग संस्था हा आहे. व्यावसायिक अर्थशास्त्र सुद्धा वैयक्तिक पातळीवरील उद्योग संस्थेच्या समस्यांचा अभ्यास केला जातो थोडक्यात सूक्ष्म अर्थशास्त्र प्रमाणे व्यावसायिक अर्थशास्त्रात अर्थव्यवस्थेतील लहानात लहान भाग असणाऱ्या उद्योग संस्थेच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित केले जाते.

2. व्यवसायिक अर्थशास्त्र हे आदर्शअनुसारी शास्त्र आहे :

दिलेल्या परिस्थितीत नेमके काय केले पाहिजे याबाबत चे विश्लेषण व्यवसायिक अर्थशास्त्र देते म्हणून व्यावसायिक अर्थशास्त्र आदर्श अनुसरी शास्त्र आहे व्यवसायिक अर्थशास्त्र चा संबंध काय होईल या बाबींशी निगडीत नाही संघटनात्मक उद्दिष्टे कार्यक्षमपणे साध्य करण्यासाठी व्यावसायिक अर्थशास्त्र व्यवस्थापनाला मार्गदर्शन करते चांगले परिणाम साध्य करण्यासाठी उद्योग संस्थेने कोणते निर्णय घ्यावेत याविषयी स्पष्टीकरण देते.

3. व्यावसायिक अर्थशास्त्र हे वर्णनात्मक नसून यथार्थचित्र दर्शविणारे शास्त्र आहे :

व्यावसायिक अर्थशास्त्र आदर्शवादी आणि व्यावहारिक अशी अर्थशास्त्राची शाखा आहे व्यवसायिक अर्थशास्त्र हे धोरणांची मांडणी निर्णय क्षमता भावी नियोजन करण्यासाठी अर्थशास्त्रीय तत्त्वांचा वापर कसा

Busi.Economics HRM

करावा याविषयी उपाययोजनाही सुचविली ते व्यावसायिक अर्थशास्त्र संघटनांची देणे निर्धारित करते तिथे साध्य करण्यासाठी विविध मार्ग सुचविते.

4. व्यावसायिक अर्थशास्त्र हे फलप्रामाण्यवादी किंवा व्यावहारिक आहे :

शुद्ध सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात सिद्धांताचे विश्लेषण करताना काही गृहिते मांडली जातात त्या सिद्धांताला काही अपवाद असतात गृहीत परिस्थिती आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यामध्ये तफावत दिसून येते व्यावसायिक अर्थशास्त्र आर्थिक सिद्धांतातील कठीण अपवादात्मक स्थिती वळते व दैनंदिन जीवनात उद्योग संस्थेच्या पातळीवर येणाऱ्या व्यावहारिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करते.

5. व्यावसायिक अर्थशास्त्र चे स्वरूप समन्वयाचे असते :

व्यावसायिक अर्थशास्त्र हे सैद्धांतिक व प्रायोगिक बाजूंमध्ये समन्वय साध्य करण्यासाठी सूक्ष्म व समग्र प्रारूपांचा उपयोग करते.

6. व्यावसायिक अर्थशास्त्र हे एक शास्त्र आणि कला आहे :

इतर सामाजिक शास्त्राप्रमाणे व्यावसायिक अर्थशास्त्रही नियम व सिद्धांताची मांडणी ज्ञानाचा व्यवस्थितपणे वापर करून केली जाते म्हणून व्यावसायिक अर्थशास्त्र हे शास्त्र आहे. व्यावसायिक अर्थशास्त्र शास्त्राप्रमाणे एक कला आहे दिलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी काही नियमांची मांडणी केली जाते व्यवस्थापनाला दुर्मिळ आर्थिक

Business Economics HRM

संसाधनाचा चांगला व कार्यक्षम वापर कसा करायचा याविषयी मदत करते उत्पादन खर्च मागणी किंमत नफा जोखीम यांच्या मदतीने योग्य पर्यायांची निवड करण्यासाठी व्यवस्थापनाला मदत करते अनिश्चिततेच्या परिस्थितीत चांगले व निकाल प्रभावलक्षी निर्णय घेण्यासाठी मदत करते.

7. जास्त शास्त्रशुद्ध विषय :

व्यावसायिक अर्थशास्त्र मध्ये अर्थमीती व रेषीय तंत्राचा वापर केला जातो व्यावसायिक अर्थशास्त्रमध्ये नफा खर्च मागणीचे पूर्वानुमान करण्यासाठी व गुंतवणुकीचे विश्लेषण करण्यासाठी संख्याशास्त्रीय पद्धती व तंत्रे वापरली जातात त्यामुळे कार्यकृती संशोधनाला मदत होते.

8. सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ :

व्यावसायिक अर्थशास्त्र मानवी कल्याणाशी निगडीत असल्याने व्यावसायिक अर्थशास्त्र मानवतावादी विचाराला महत्त्व देते देशाचे सामाजिक व राजकीय पर्यावरण विचारात घेऊन व्यवसायसंस्थांची कार्यपद्धती ठरवते. मानवी मूल्य व देशाची सांस्कृतिक चौकटीला बाधा पोहोचणार नाही याचा विचार व्यावसायिक अर्थशास्त्र चे स्वरूप ठरविताना केला जातो बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आगमनामुळे देशातील सांस्कृतिक बैठकीला बाधा पोहोचणार नाही याबाबत दक्षता घेतली जाते.

Busi.Economics HRM

1.1.3 व्यावसायिक अर्थशास्त्राची व्याप्ती

व्यावसायिक अर्थशास्त्रात अभ्यासल्या जाणाऱ्या अभ्यासविषयांचा समावेश व्यावसायिक अर्थशास्त्र च्या व्याप्तीत होतो व्यावसायिक अर्थशास्त्राच्या व्याप्तीत सिद्धांत प्रतिमाने व पद्धतींचा समावेश होतो त्यामुळे व्यवसाय संस्थेला निर्णय घेणे आणि भविष्यकालीन नियोजन करण्यासाठी मदत होते काळाच्या ओघात अनेक नवीन अभ्यास विषयांचा समावेश व्यावसायिक अर्थशास्त्राच्या व्याप्तीत झाल्यामुळे व्यावसायिक अर्थशास्त्राची व्याप्ती व्यापक झालेली आहे.

1.उपभोगाचे सिद्धांत :

व्यवसायिक अर्थशास्त्राच्या व्याप्तीत उपभोक्ते यांच्या वर्तणुकीचा अभ्यास केला जातो मागणीचा नियम मागणीची लवचिकता मूल्यदर्शी उपयोगिता क्रमदर्शी उपयोगिता यांचा अभ्यास केला जातो.

2. उत्पादनाचे सिद्धांत :

व्यावसायिक अर्थशास्त्रात आदान-प्रदान संबंधाचा म्हणजे उत्पादन फलनाचा अभ्यास केला जातो उत्पादन फलाचे नियम बदलत्या प्रमाणाचा नियम पर्याप्त घटक संयोग सम उत्पादन वक्र व समखर्च वक्र या महत्त्वाच्या घटकांचा अभ्यास व्यावसायिक अर्थशास्त्रात केला जातो.

3. किंमत सिद्धांत :

किंमत विश्लेषण व्यावसायिक अर्थशास्त्राचा महत्त्वाचा अभ्यास विषय आहे किमतीवरून उद्योग संस्थेच्या खर्चाचे व प्राप्तीचे आकलन होते किंमत विषयक सिद्धांतात विविध बाजार प्रकारातील किंमतनिश्चिती किंमतनिश्चितीच्या पद्धतीचा आणि तिच्या पूर्वानुमानयाचा अभ्यास केला जातो.

4. उद्योगसंस्थेचे सिद्धांत :

व्यावसायिक अर्थशास्त्रात विविध प्रकारच्या बाजार प्रकारात व्यक्तिगत उद्योग संस्थेची किंमत व उत्पादननिश्चितीचा अभ्यास केला जातो उदाहरणार्थ पूर्ण स्पर्धा अपूर्ण स्पर्धा मक्तेदारी अधिकार अल्पविक्रेता अधिकार इत्यादी.

5. वितरणाचे सिद्धांत :

व्यावसायिक अर्थशास्त्र उत्पादन घटकांच्या किमती व राष्ट्रीय उत्पन्नातील त्यांचा वाटा याविषयी अभ्यास केला जातो याचे नियोजन हा व्यावसायिक अर्थशास्त्राचा मुख्य अभ्यास विषय आहे.

Busi. Economics HRM

6. नफ्याचे सिद्धांत :

उद्योग संस्थेच्या स्थापनेमागील मुख्य उद्देश नफा मिळविणे हा असतो एकूण प्राप्ती व एकूण खर्च यातील तफावत म्हणजे नफा होय प्राप्तीत वाढ कशी करावी आणि खर्चात घट कशी करावी याचा अभ्यास मुख्यत्वे व्यावसायिक अर्थशास्त्रात केला जातो.

7. मागणी विश्लेषण व मागणीचे पूर्वानुमान :

अनिश्चिततेच्या वातावरणात महत्तम नफा मिळविण्याच्या उद्देशाने उद्योग संस्था कार्य करतात उद्योग संस्था किंमत व उत्पादनाविषयी निर्णय घेताना मागणीचा पूर्वअंदाज मागणीच्या पूर्वानुमानच्या पद्धतीचा अभ्यास व्यवसायिक अर्थशास्त्रात केला जातो.

8. भांडवलाचे व्यवस्थापन :

भांडवल गुंतवणुकीच्या निर्णयाला उद्योग संस्था उच्च प्राधान्य देतात भांडवल गुंतवणूक भांडवलाचा खर्च प्राप्तीचा दर गुंतवणुकीसाठी प्रकल्प निवडीच्या निर्णयाचा अभ्यास व्यावसायिक अर्थशास्त्रात केला जातो.

9. विक्रय वृद्धी :

व्यवस्थापकाला विक्री जाहिरात खर्चाबाबत योग्य पद्धतीने दखल घ्यावी लागते व्यवस्थापकाला विक्री खर्च व्यापारी प्रतीक वस्तूचे आकारमान आणि गुणवत्ता या विषयांचा अभ्यास मुख्यत्वे व्यावसायिक अर्थशास्त्रात केला जातो.

Busi.Economics HRM

10. आर्थिक धोरणे :

चलनविषयक धोरण राजकोषीय धोरण औद्योगिक व्यापार व श्रम विषयक सरकारच्या धोरणांचा उद्योगसंस्थेच्या निर्णयावर परिणाम होतो उद्योग संस्थेला विविध प्रकारच्या पर्यायी उपयोगासाठी साधनसामग्रीचा वापराचे नियोजन करावे लागते.

1.1.4 व्यावसायिक अर्थशास्त्राचे महत्त्व

व्यावसायिक अर्थशास्त्र ही अलीकडच्या काळात विकसित झालेली अर्थशास्त्राची एक महत्त्वाची अभ्यास शाखा आहे अर्थव्यवस्थेत विविध वस्तू व सेवा यांचे उत्पादन घेतले जाते या सर्वच ठिकाणी व्यावसायिक अर्थशास्त्र चा वापर व्यवस्थापकीय व उपयोजित अर्थशास्त्र म्हणून केला जातो त्या दृष्टिकोनातून बदलत्या आर्थिक परिस्थितीमध्ये व्यावसायिक अर्थशास्त्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

व्यावसायिक अर्थशास्त्राचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल .

1. **व्यावसायिक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त :** व्यवसायिक निर्णय घेण्यासाठी अर्थशास्त्रातील विविध सिद्धान्त तत्वे व संकल्पना यांचा वापर कसा केला जातो याचा अभ्यास करण्यासाठी व्यवसायिक अर्थशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

2. **व्यवसायिक परिस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी उपयुक्त :** व्यावसायिक परिस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी व अर्थशास्त्रीय कल्पनांचा उपयोग

Business Economics HRM

करण्यासाठी व्यावसायिक अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राचे एक महत्वाची अभ्यासशाखा आहे.

3. **अर्थशास्त्रीय सिद्धांत :** व्यावसायिक कृतींना अर्थशास्त्रीय सिद्धांत व पद्धती लागू करण्याच्या दृष्टिकोनातून व्यावसायिक अर्थशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

4. **स्थूल घटकांच्या अभ्यासासाठी उपयुक्त :** राष्ट्रीय उत्पन्न सरकारी धोरणे आंतरराष्ट्रीय व्यापार इत्यादी स्थूल घटकांचा अभ्यास करण्यासाठी व्यावसायिक अर्थशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

5. **व्यवसायिक जोखीम कमी करण्यासाठी उपयुक्त :** व्यवसायातील अनिश्चितता कमी करण्यासाठी एक प्रभावी साधन म्हणून व्यावसायिक अर्थशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

6. **आर्थिक सिद्धांत व प्रत्यक्ष व्यवहार यांच्यातील समन्वयक :** अर्थशास्त्रातील काही सिद्धांत हे काही गृहीतकांवर आधारित असतात प्रत्यक्षात गृहीतत्यामुळे हे सिद्धांत अर्थव्यवस्थेचे योग्य विश्लेषण करण्यात यशस्वी ठरतात व्यावसायिक अर्थशास्त्र हे आर्थिक सिद्धांत व प्रत्यक्ष व्यवहार यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न करते.

Busi. Economics HRM

सूक्ष्म अर्थशास्त्र अर्थ आणि व्याख्या

(Meaning and Definitions of Micro Economics)

अर्थशास्त्राचा अभ्यास करताना सर्वप्रथम प्रा.रॅग्नर फ्रिश यांनी 1933 साली आणि अर्थशास्त्राचे सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र असे दोन भागांमध्ये विभाजन केले आहे. सूक्ष्म अर्थशास्त्राला व्यष्टी किंवा अंशलक्षी व स्थूल अर्थशास्त्राला अर्थशास्त्राला समष्टी किंवा समग्रलक्षी अर्थशास्त्र असेही संबोधले जाते.सूक्ष्म अर्थशास्त्राला इंग्रजीमध्ये Micro Economics असे म्हणतात. Micro या शब्दाची उत्पत्ती ग्रीक भाषेतील Mikros या शब्दापासून झाली आहे. Mikros म्हणजे सूक्ष्म किंवा लहान असा अर्थ होतो. तर स्थूल अर्थशास्त्राला इंग्रजीमध्ये Macro Economics असे म्हणतात. Macro या शब्दाची उत्पत्ती ग्रीक भाषेतील Macros या शब्दापासून झाली आहे.याचा अर्थ स्थूल किंवा समग्र असा होतो. अशा प्रकारे सूक्ष्म अर्थशास्त्र विशिष्ट उपभोक्ते,मुख्य उत्पादन संस्था, विशिष्ट वस्तू इत्यादी लहानात लहान घटकांचा अभ्यास करते. तर समग्र अर्थशास्त्र संपूर्ण अर्थव्यवस्थेशी संबंधित एकूण रोजगार, एकूण उत्पादन, एकूण बचत व सर्वसाधारण किंमत पातळी इत्यादी घटकांचा अभ्यास करते.

Busi.Economics HRM


प्रा.रॅग्नर फ्रिश यांनी 1933 साली अर्थशास्त्राचे दोन भागांमध्ये विभाजन केले.
सूक्ष्म अर्थशास्त्र Micro Economics
स्थूल अर्थशास्त्र Macro Economics
Micro या शब्दाची उत्पत्ती ग्रीक भाषेतील Mikros या शब्दापासून झाली आहे. Mikros म्हणजे सूक्ष्म किंवा लहान असा अर्थ होतो.
Macro या शब्दाची उत्पत्ती ग्रीक भाषेतील Macros या शब्दापासून झाली आहे.Macros याचा अर्थ स्थूल किंवा समग्र असा होतो.

Busi.Ec

व्याख्या :-

सूक्ष्म अर्थशास्त्रात एक व्यक्ती किंवा विशिष्ट गटातील आर्थिक क्रियांचा अभ्यास केला जातो. काही अर्थशास्त्रज्ञांनी सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

" **सूक्ष्म अर्थशास्त्र म्हणजे विशिष्ट उद्योगसंस्था**, **विशिष्ट कुटुंब** , **वैयक्तिक किंमत**,**मजुरी**,**उत्पन्न**,**विशिष्ट उद्योग तसेच विशिष्ट वस्तू इ**.**चा अभ्यास होय**."

- **प्रा.के.ई. बोल्डिंग**

"Micro economics is the study of particular firm, particular household, individual price, wages, income, individual industries and particular commodity ."

- **Prof. K.E.Boulding**

2. "सूक्ष्म अर्थशास्त्र म्हणजे अर्थव्यवस्थेचे सूक्ष्मपणे अभ्यास करणारे शास्त्र होय"

-मॉरीस डॉब

" Micro Economics is microscopic study of the economy."

- Maurice Dobb

Busi.Economics HRM

3. "अर्थव्यवस्थेच्या जैविक प्रणालीत कुटुंबे व उपभोक्त्यांची तसेच व्यक्ती व उद्योगसंस्था उत्पादकांची भूमिका कशी पार पाडतात हे अभ्यासण्यासाठी अर्थव्यवस्थेकडे सूक्ष्मदर्शकाद्वारे पाहणे याचा समावेश सूक्ष्म अर्थशास्त्रात होतो."

-प्रा. ए.पी.लर्नर

" Micro Economics consists of looking at the economy through a microscope as it where,to see how the millions of the celles the body economic the individuals or households as consumers and the individuals or firms as producers play their part in the working of the whole economic organism."

- Prof.A.P Learner

सूक्ष्म अर्थशास्त्राचे स्वरूप (Nature of Micro Economics) : -

सूक्ष्म अर्थशास्त्रात विशिष्ट कुटुंब, विशिष्ट उद्योगसंस्था,तसेच वैयक्तिक उद्योगांमधील परस्परसंबंधांचे अध्ययन केले जाते. सूक्ष्म अर्थशास्त्रच्या स्वरूपामध्ये पुढील घटकांचा समावेश होतो.

Busi. Economics HRM

सूक्ष्म अर्थशास्त्रच्या स्वरूपामध्ये पुढील घटकांचा समावेश होतो.

1)अर्थव्यवस्थेतील विशिष्ट आर्थिक घटकांचा अभ्यास :-

सूक्ष्म अर्थशास्त्र मध्ये अर्थव्यवस्थेतील विशिष्ट वस्तूची मागणी, विशिष्ट वस्तूचा पुरवठा, उपभोक्त्याचे वर्तन म्हणून विशिष्ट उद्योग संस्थेचा समतोल व विशिष्ट उत्पादन घटकांच्या किमती इत्यादी विशिष्ट घटकांचा सूक्ष्मरीत्या अभ्यास केला जातो.

Busi.Economics

2) आंशिक समतोल :-

अर्थव्यवस्थेतील एका विशिष्ट क्षेत्रात होणाऱ्या समतोलाचा अंशिक समतोल असे म्हणतात. विशिष्ट वस्तूंची व सेवांची मागणी व पुरवठा यामध्ये समतोल होऊन संतुलित किंमत कशी निश्चित होते याचे विश्लेषण सूक्ष्म अर्थशास्त्रात केले जाते.

3) परस्परावलंबनाचा अभाव :-

सूक्ष्म अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेतील सूक्ष्म आर्थिक घटकांमध्ये परस्परावलंबन असते. याकडे दुर्लक्ष करते, उदाहरणार्थ, मागणी किंवा पुरवठ्यावर किमती बरोबर इतर घटकांचाही परिणाम होत असला तरी सूक्ष्म अर्थशास्त्र मागणी व पुरवठयाच्या नियमात इतर घटक स्थिर म्हणून परस्परावलंबन दुर्लक्षित केले जाते.

4) अर्थव्यवस्थेतील सूक्ष्म आर्थिक प्रश्नांचा अभ्यास :-

स्थूल अर्थशास्त्र समग्र अर्थव्यवस्थेतील साधारण किंमत पातळी निश्चित करणे, व्यापार चक्र, बेकारी व दारिद्य इत्यादी प्रश्नांचा अभ्यास केला जातो. परंतु सूक्ष्म अर्थशास्त्रात विशिष्ट वस्तूंची किंमत, विशिष्ट उद्योगसंस्थेचे समतोल, विशिष्ट उत्पादन घटकांची किंमत निश्चिती, विशिष्ट वस्तूंची मागणी व पुरवठा इत्यादी बाबींचा अभ्यास केला जातो म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र सूक्ष्म आर्थिक प्रश्नांचा विचार केला जातो.

Business Economics HRM

5) गृहितांचा आधार :-

सूक्ष्म अर्थशास्त्रातील सर्व नियम व सिद्धांत अनेक गृहीतकांवर आधारित आहेत. उदाहरणार्थ इतर परिस्थिती कायम असताना पूर्ण रोजगार, पूर्ण स्पर्धा इत्यादी म्हणून सूक्ष्म अर्थशास्त्र यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

6) साधनसंपत्तीच्या वितरणावर भर :-

अर्थव्यवस्थेतील उपलब्ध साधन संपत्तीचे विभाजन,उत्पादन प्रक्रियेत सहभागी असणारे उत्पादन घटक जसे(भूमी, श्रम, भांडवल व संयोजक) यामध्ये खंड, वेतन, व्याज व नफा कशा प्रकारे केले जावे या संबंधीच्या सिद्धांताचा अभ्यास सूक्ष्मअर्थशास्त्र केला जातो.

7) बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्था गृहीत :-

सूक्ष्म अर्थशास्त्र बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्था महत्त्वाची मानली जाते. म्हणजे मागणी व पुरवठा नुसार किंमत निश्चित झालेली असते यानुसार निश्चित झालेली किंमत, उत्पादक व ग्राहकांना मूलभूत आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी मार्गदर्शक ठरते.

8) वस्तुरूप घटक महत्वाचे :-

अर्थव्यवस्थेतील एका व्यक्तीची मागणी व पुरवठा, उपयोगिता तसेच उत्पादन इ. वस्तुरूप वास्तव घटकांना सूक्ष्म अर्थशास्त्राच्या विश्लेषणात महत्त्व आहे .परंतु स्थूल अर्थशास्त्रात आर्थिक घटकांच्या पैशातील मूल्याला महत्व दिले जाते.

Busi.Economics HRM

9) विनिमय :-

विशिष्ट वस्तूंची व सेवांची किंमत निरनिराळ्या परिस्थितीत कशाप्रकारे निश्चित होते मागणी व पुरवठा च्या सहाय्याने विशिष्ट वस्तू व सेवांची देवाण-घेवाण कशी होते ?याचे विश्लेषण सूक्ष्म अर्थशास्त्रात केले जाते.

10) समतोलाचे भिन्न कारण :-

अंशलक्षी अर्थशास्त्रात किंमतीतील बदलाद्वारे मागणी आणि पुरवठा यात बदल होतो. व्याजदरातील बदलामुळे बचत आणि गुंतवणूक यात बदल होतात. परंतु समग्रलक्षी अर्थशास्त्र उत्पन्नातील बदलाद्वारे अर्थव्यवस्थेत बदल होतात असे मानले जाते.

1.1.3 सुक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती:-

Scope of Micro Economics

सूक्ष्म अर्थशास्त्र मध्ये कोणकोणत्या घटकांचा अभ्यास केला जातो याचा विचार करणे म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती होय.



RP Economics HRM

सूक्ष्म अर्थशास्त्र उपलब्ध संसाधनांचे पर्याप्त वितरण कसे करावे? त्यातून महत्तम उत्पादन कसे प्राप्त होईल? बाजारामध्ये संतुलित किंमत व उत्पादन पातळी कशी निश्चित होते?लोकांचे आर्थिक कल्याण कसे होते ? यांसारख्या अनेक प्रश्नांचा अभ्यास केला जातो. सूक्ष्म अर्थशास्त्रच्या व्याप्ती मध्ये पुढील घटकांचा समावेश होतो.

1. मागणीचा सिद्धांत

मूल्यसिद्धांतात मागणी व मागणीशी संबंधित नियमांच्या सिद्धांताचा समावेश होतो.वस्तूची मागणी ही उपभोक्त्याच्या आर्थिक वर्तणुकीवर अवलंबून असते. वस्तू किंमत कशी निर्धारित होते ,उपभोक्त्याला महत्त्व प्राप्त होऊन समाधान तर कसे प्राप्त होते,उपयोगीतेसंबंधित उपयोगितेचे नियम, मागणीचा नियम, मागणीची लवचिकता,मागणीचे विविध सिद्धान्त यांचा अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्र मध्ये केला जातो.

1) उत्पादन सिद्धांत

वस्तूचा पुरवठा हा उत्पादनाची स्थिती किंवा उत्पादनाचे फल तसेच उत्पादन संस्था व उद्योजक यांच्या आर्थिक वर्तणुकीवर अवलंबून असते .वस्तूचा पुरवठा आणि वस्तूची किंमत यातील संबंध कालपरत्वे उत्पादन घटक आणि उत्पादनातील संबंध काय,पुरवठा नियम, सम उत्पादन वक्र व उत्पादनाचे विविध सिद्धान्त यांचा अभ्यास त्यामध्ये केला जातो.

2) खर्चाचे सिद्धांत

वस्तूच्या किंमत निश्चितीमध्ये मागणी व पुरवठा या दोन बाजूंना जसे महत्त्व असते तसेच महत्त्व उत्पादकाच्या प्राप्ती व खर्चाला असते.म्हणूनच वस्तूंचे उत्पादन त्या वस्तूचे उत्पादन खर्चावर अवलंबून असते. विविध उत्पादनविषयक निर्णय घेताना उत्पादन

Busi.Economics HRM

खर्चाचे विविध प्रकार लक्षात घ्यावे लागतात. खर्चाच्या सिद्धांताचा सविस्तर अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्र मध्ये केला जातो.

4) बाजार संरचना

उत्पादकांनी केलेल्या उत्पादन खर्च व त्यापासून मिळालेली प्राप्ती यावरून संतुलित किंमत पातळी व उत्पादन पातळी निर्धारित होते. तसेच बाजारातील उद्योग व उद्योगसंस्थेच्या संतुलनाचे स्वरूप समजून घेण्याकरिता विविध बाजाराचा अभ्यास करणे आवश्यक आहे. सूक्ष्म अर्थशास्त्रामध्ये पूर्ण स्पर्धा, मक्तेदारी,मक्तेदारीयुक्त स्पर्धा, बाजारपेठ व अल्प विक्रेताधिकार बाजारपेठ इत्यादींचा अभ्यास केला जातो.

5) उत्पादन घटक किंमत निर्धारणाचे सिद्धांत

उत्पादन प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या उत्पादन घटकांना त्यांच्या कार्याबाबत दिला जाणारा मोबदला म्हणजे घटक किंमत होय.या किमती कशा निर्धारित होतात या संबंधित सीमांत वितरणाचा सिद्धांत तसेच भूमी, श्रम, भांडवल व संयोजक या उत्पादन घटकांना दिले जाणारे मोबदला खंड, वेतन, व्याज व नफा कसे निर्धारित केले जातात या संदर्भातील सिद्धांताचा अंतर्भाव उत्पादन घटक किंमत निर्धारणाच्या सिद्धांतात होतो. या सिद्धांताला वितरणाचा सिद्धांत असेही म्हणतात.

6) आर्थिक कल्याणाचे सिद्धांत

सूक्ष्म अर्थशास्त्रामध्ये अर्थशास्त्राला मूल्य सिद्धांत तितकेच महत्त्वाचे मानले जाते. उपभोक्त्याच्या किंवा उत्पादकाच्या आर्थिक कल्याणाचा संबंध कार्यक्षमतेशी येतो. संसाधनाचा पर्याप्त वितरण झाल्यास लोकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होऊन कार्यक्षमतेत वाढ होईल ,परिणामी सर्वांच्याच आर्थिक करण्यात वाढ होईल.

Busi. Economics HRM

आर्थिक कार्यक्षमता ही आर्थिक कल्याणाच्या सिद्धांताचा महत्त्वाचा विषय ठरते. सूक्ष्म आर्थिक विश्लेषण व कार्यक्षमता नष्ट करण्यासाठी कार्यक्षमतेचे निकष स्पष्ट करते .लर्नरच्या मते, पॅरोटो यांच्या आदर्श अटी कार्यक्षमता वाढवून लोकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यास मदत होऊ शकते.

अशा प्रकारे सूक्ष्म अर्थशास्त्रात विशिष्ट उद्योगसंस्था, विशिष्ट किंमत, वेतन, उत्पन्न, विशिष्ट वस्तू यांसारख्या लहान-लहान आर्थिक घटकांचा अभ्यास केला जातो.

१.१.४ सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्व

Importance of Micro Economics

१.स्थूल समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी उपयुक्त ः –

सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासावरून संपूर्ण अर्थव्यवस्थेची कार्यप्रणाली समजते. अनेक समग्रलक्षी अभ्यास विषयांना सूक्ष्म अर्थशास्त्राच्या विवेचनाचा आधार घ्यावा लागतो. समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी सूक्ष्म अर्थ शास्त्र उपयुक्त ठरते.

२.आर्थिक कल्याण ः –

कल्याणकारी अर्थशास्त्राची उभारणी संपूर्णतः मूल्य सिध्दांतावर झालेली आहे. मूल्य सिध्दांत हा सूक्ष्म अर्थशास्त्राचा गाभा आहे. कल्याणकारी अर्थशास्त्र महत्तम सामाजिक कल्याणाशी निगडीत आहे. सूक्ष्म अर्थशास्त्र महत्तम सामाजिक

Busi.Economics HRM

कल्याण साधण्यासाठी विविध मार्ग व उपाय सुचविते. सूक्ष्म अर्थशास्त्र कल्याणकारी अर्थशास्त्राच्या अभ्यासाला उपयुक्त ठरते. कल्याणकारी अर्थशास्त्राच्या ते पायाभूत सोयी पुरविते.

३. आर्थिक धोरणे ठरविण्यासाठी उपयुक्त ः –

सरकारला आपल्या आर्थिक धोरणांचे मूल्यमापन करण्यासाठी सूक्ष्म अर्थशास्त्र विश्लेषणाची साधने पुरविते. उदा. सूक्ष्म अर्थशास्त्रात किंमतयंत्रणेचा अभ्यास समाविष्ट असतो. वेगवेगळया वस्तूंच्या किंमती किंवा उत्पादन घटकांच्या किंमती कशा ठरविल्या जातात हे अभ्यासले जाते. त्यामुळे सरकारला पोस्ट, वीज, रेल्वे इ. सार्वजनिक उपयुक्ततेच्या सेवांच्या किंमती ठरविण्यासाठी सूक्ष्म अर्थशास्त्र उपयोगी ठरते.

४. देशाच्या आर्थिक विकासासाठी ः –

देशाच्या आर्थिक विकासासाठी शेतकरी, कामगार, भांडवलदार, उद्योजक यांच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्रात केला जातो. या घटकांच्या सक्ष्म अभ्यासावरून विकासाच्या योजना आखता येतात व अंमलबजावणी करता येते.

Business Economics HRM

५.कर धोरण ठरविण्यासाठी उपयुक्त ः –

उत्पन्न कर, विक्रीकर, उत्पादन कर यांचा व्यक्तिगत अभ्यास सूक्ष्म अर्थ शास्त्रात सामाविष्ट असतो. कोणत्या करामुळे सामाजिक कल्याणात घट होते, तसेच कोणत्या कराचा समाजावर जास्त प्रतिकूल परिणाम होतो हे स्पष्ट करून सरकारने कोणता कर किती प्रमाणात बसवावा यासंबंधी सूक्ष्म अर्थशास्त्र मार्गदर्शन करते, त्यामुळे सरकारला करविषयक धोरण ठरविण्यात सूक्ष्म अर्थशास्त्र उपयोगी ठरते.

६.व्यावसायिकांसाठी उपयुक्त ः –

उदयोगातील व्यावसायिकांना आपल्या वस्तूच्या मागणीसंदर्भात अंदाज वर्त विण्यासाठी उपयुक्त ठरते, कारण सूक्ष्म अर्थशास्त्रात व्यक्तिगत मागणीचा अभ्यास केला जातो. या मागणीच्या अंदाजावरून उदयोजकांना वस्तूचे किती उत्पादन करायचे ते समजते. त्यावरून उत्पादक वस्तूच्या उत्पादनाबाबत निर्णय घेतात.

७.आर्थिक सिध्दांताबाबत ः –

सूक्ष्म अर्थशास्त्रात एखादया किंवा विशिष्ट घटकांचा अभ्यास करून गुंतागुंतीच्या व क्लिष्ट आर्थिक प्रक्रियेत सोपेपणा आणूण आर्थिक सिध्दांत मांडले जातात.

Business Economics HRM

८.साधनसामग्रीचे वाटप व विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ः –

अर्थव्यवस्थे साधनसामग्रीचे कार्यक्षम वाटप कसे घडवून आणावे हे सूक्ष्म अर्थ शास्त्रात अभ्यासले जाते.त्यामुळे शरकार विविध क्षेत्रांत साधनसामुग्रीचे कार्यक्षम वाटप घडवून आणून आर्थिक विकास घडवून आणला जातो.

उत्पादन कशाचे□ कोणासाठी□ किती प्रमाणात□ कोणत्या पध्दतीने□ करावयाचे तसेच आपले मर्यादित उत्पन्न कशा प्रकारे खर्च करून महत्तम समाधान मिळवावे इ.प्रश्नांची उत्तरे सूक्ष्म अर्थशास्त्रात अभ्यासाने मिळतात.

९.आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत ः –

सूक्ष्म अर्थशास्त्रात आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे फायदे□व्यवहारतोलातील असमतोल□परकिय विनिमय दर इ.चा अभ्यास करते.परकीय चलनातील मागणी पुरवठयातील असमतोलामुळे व्यवहारतोलात असमतोल निर्माण होतो व परकीय चलनाच्या मागणी – पुरवठयावरून विनिमय दर ठरतो.तसेच दोन देशांतील मागणीच्या लवचिकतेवरून आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे ठरतात असे स्पष्टीकरण सूक्ष्म अर्थशास्त्र देते.

Business Economics HRM

१० . विशिष्ट उदयोग व संस्था यांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी ः –

काही विशिष्ट उदयोग व संस्था यांच्यासमोर जेव्हा काही गंभीर प्रश्न निर्माण होतात तेव्हा ते पेचप्रसंग समजण्यासाठी सूक्ष्म अर्थशास्त्राची मदत होते .

समग्र अर्थशास्त्र

समग्र अर्थशास्त्राला साकलित अर्थशास्त्र, समष्टी अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र असे पर्यायी शब्द देखील वापरले जातात. अर्थशास्त्रात समग्र अर्थशास्त्र या संज्ञेचा वापर सर्वप्रथम सर 1933 मध्ये विद्यापीठाचा नायजेरियन अर्थतज्ञ प्रा.रॅग्नर फ्रिश यांनी केला. समग्र अर्थशास्त्राला इंग्रजीमध्ये Macro Economics हा पर्यायी शब्द वापरला जातो.Micro इंग्रजी शब्दाची उत्पत्ती Makrosया ग्रीक शब्दापासून झालेली आहे. या शब्दाचा इंग्रजीत शब्दश: अर्थ large आणि मराठीत मोठा असा होतो.समग्र अर्थशास्त्र हे समग्र पातळीवरील एकूण रोजगार, एकूण उत्पादन, राष्ट्रीय उत्पन्न इत्यादींचा अभ्यास करते.

समग्र अर्थशास्त्राच्या व्याख्या

समग्र अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची अशी एक महत्त्वाची अभ्यास शाखा आहे की जी एका विशिष्ट घटकांचा अभ्यास न करता सर्व घटकांचा एकत्रितपणे अभ्यास करते. समग्रलक्षी अर्थशास्त्र हा संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास होय. राष्ट्रीय उत्पन्न व रोजगार निश्चिती संबंधीचे स्पष्टीकरण या समग्र अर्थशास्त्र चा अभ्यास विषय आहे.

Busi.Economics HRM

"समग्र अर्थशास्त्र वैयक्तिक परिमाणाशी संबंधित नसून ते अशा परिमाणाच्या समुच्चयाशी संबंधित असते, ज्याचा संबंध राष्ट्रीय उत्पन्न सर्वसाधारण किंमत पातळी राष्ट्रीय उत्पादनाचे असतो."

- **प्रा.के.ई. बोल्डिंग**

"समग्र अर्थशास्त्राचा संबंध अशा मोठ्या आर्थिक व्यवहाराशी असतो जे आर्थिक जीवनाच्या सर्वसमावेशक विस्तारित बाबींशी संबंधित असते."

-प्रा. ॲक्ले

"समग्र अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची अशी महत्त्वाची शाखा आहे की,जी रोजगाराचे प्रमाण, एकूण बचत आणि गुंतवणूक, राष्ट्रीय उत्पन्न, सर्वसाधारण किंमतपातळी,एकूण मागणी व एकूण पुरवठा, एकूण उत्पादन,एकूण उपभोग अशा मोठ्या समस्या संबंधांचा विचार करते."

– **प्रा.जे.एल.हॅनसन**

अशा प्रकारे वरील व्याख्यांवरून वरून असे दिसून येते की, समग्र अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेत समग्र बाबींचा अभ्यास केला जातो.

Busi.Economics HRM

समग्र अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये

1. समग्र अर्थशास्त्रात एकूणाचा ,बेरजेचा, सरासरीचा व समुच्चयाचा अभ्यास केला जातो.

2. समग्र अर्थशास्त्रात अभ्यासाचे परिणाम एक व्यक्ती किंवा एक घटक नसून संपूर्ण अर्थव्यवस्था असते.

3. समग्र अर्थशास्त्रात सर्व घटक मिळून तयार होणाऱ्या समुच्चयात्मक पातळीवर अभ्यास केला जातो.

4. समग्र अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा उत्पन्न हा केंद्रबिंदू आहे.

5. समग्र अर्थशास्त्रात स्थिर आणि गतिमान घटकांचा एकत्रित अभ्यास केला जातो. समग्र

   अर्थशास्त्रात गतिमान घटकांच्या अभ्यासाला विशेष महत्त्व असते.

6. समग्र अर्थशास्त्रात प्रत्येक घटकाचा स्वतंत्र अभ्यास न करता एका घटकातील बदलाचा दुसऱ्या घटकावर होणारा परिणाम अभ्यासला जातो.

Busi.Economics HRM

सूक्ष्म व समग्र अर्थशास्त्र यांमधील फरक

जर्मन अर्थशास्त्रज्ञ **प्रा. रॅंग्नर फ्रिश यांनी सन 1933** मध्ये अर्थशास्त्राच्या अभ्यासविषयाची विभागणी सूक्ष्म अर्थशास्त्र व समग्र अर्थशास्त्र अशा दोन शाखांमध्ये केलेली आहे. अर्थशास्त्राच्या या दोन्ही शाखा परस्पर पर्यायी नसून परस्परपूरक आणि परस्परावलंबी आहेत.त्यामुळे या दोन्ही शाखांमध्ये अर्थशास्त्राच्या अभ्यासविषयाची तंतोतंत किंवा काटेकोरपणे विभागणी करता येत नाही.

काही मुद्द्यांच्या आधारे सूक्ष्म व समग्र अर्थशास्त्रातील फरक स्पष्ट करता येईल.

मुद्दे	सूक्ष्म अर्थशास्त्र	समग्र अर्थशास्त्र
1.अर्थ	सूक्ष्म अर्थशास्त्राला इंग्रजीमध्ये Micro Economics असे म्हणतात. Micro या शब्दाची उत्पत्ती ग्रीक भाषेतील Mikros या शब्दापासून झाली आहे.	स्थूल अर्थशास्त्राला इंग्रजीमध्ये Macro Economics असे म्हणतात. Macro या शब्दाची उत्पत्ती ग्रीक भाषेतील Macros या शब्दापासून झाली

Busi.Economics HRM

	Mikros म्हणजे सूक्ष्म किंवा लहान असा अर्थ होतो.	आहे.याचा अर्थ स्थूल किंवा समग्र असा होतो.
2.व्याख्या	" सूक्ष्म अर्थशास्त्र म्हणजे विशिष्ट उद्योगसंस्था, विशिष्ट कुटुंब , वैयक्तिक किंमत,मजुरी,उत्पन्न, विशिष्ट उद्योग तसेच विशिष्ट वस्तू इ.चा अभ्यास होय." **- प्रा.के.ई. बोल्डिंग**	"समग्र अर्थशास्त्र वैयक्तिक परिमाणाशी संबंधित नसून ते अशा परिमाणाच्या समुच्चयाशी संबंधित असते, ज्याचा संबंध राष्ट्रीय उत्पन्न सर्वसाधारण किंमत पातळी राष्ट्रीय उत्पादनाचे असतो." **- प्रा.के.ई. बोल्डिंग**
3.वापर	सूक्ष्म अर्थशास्त्र चा वापर प्राचीन काळापासून केला जातो.सनातनवादी व नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी सूक्ष्म आर्थिक विश्लेषण पद्धतीचा पुरस्कार केलेला आहे.	समग्र अर्थशास्त्राचा वापर जागतिक मंदीनंतर मोठ्या प्रमाणावर करण्यात आला. जे एम केन्स यांनी समग्र विवेचन पद्धतीने समर्थन केलेले आहे.

Busi.Economics HRM

	ॲडम स्मिथ यांनी सुक्ष्म आर्थिक विश्लेषण पद्धतीचे समर्थन केलेले आहे .	
4. अभ्यासाचे परिणाम	सूक्ष्म अर्थशास्त्रात एकाचा, वैयक्तिक किंवा विशिष्ट व्यक्तिगत पातळीवर अभ्यास केला जातो. उदाहरणार्थ विशिष्ट उद्योग संस्था, विशिष्ट कुटुंब, वैयक्तिक उत्पन्न,वैयक्तिक उद्योगधंदा.	समग्र अर्थशास्त्रात एकूण समुच्चयाचा,सरासरीचा किंवा बेरजेचा अभ्यास केला जातो.उदा.एकूण रोजगार, एकूण बचत, राष्ट्रीय उत्पन्न ,सर्वसाधारण किंमतपातळी.
5. व्याप्ती	सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती त्या वस्तूची किंमत निश्चिती, उत्पादन घटकांची किंमत निश्चिती आणि आर्थिक कल्याण या अभ्यासविषयांचा समावेश होतो.	समग्रलक्षी अर्थशास्त्राची व्याप्तीत उत्पन्न व रोजगार, सर्वसामान्य किंमत पातळी, आर्थिक विकासाचे सिद्धांत, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत ,विभाजनाचे समग्र सिद्धांत,

Busi Economics HRM

		आर्थिक धोरण या अभ्यास विषयांचा समावेश होतो.
6. व्यक्तिगत विरुद्ध समग्र	सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक घटकांचा व्यक्तिगत पातळीवर विचार केला जातो. व्यक्तिगत पातळीवर जे खरे असते ते जसेच्या तसे लागू केले जाते. उदाहरणार्थ व्यक्तिगत पातळीवर बचत हा सद्गुण आहे.	समग्र अर्थशास्त्रामध्ये समुच्चयाचा किंवा संपूर्ण देशाच्या पातळीवर विचार केला जातो.व्यक्तिगत पातळीवर जे खरे असते ते समाजाच्या पातळीवर जसेच्या तसे लागू केले जात नाही. उदाहरणार्थ व्यक्तिगत पातळीवर बचत हा सद्गुण असला तरी समाजाच्या पातळीवर तो दुर्गुण होऊ शकतो.
7. स्वावलंबन व परस्परावलंबन	सूक्ष्म अर्थशास्त्रात प्रत्येक घटक हा स्वतंत्र असतो आणि तो स्वयंपूर्ण असतो. एका घटकातील बदलाचा दुसऱ्या घटकावर परिणाम होत नाही.	समग्र अर्थशास्त्रात एक घटक दुसऱ्या घटकावर अवलंबून असतो.एका घटकातील बदलाचा दुसऱ्या घटकावर प्रभाव पडतो.

Busi.Economics HRM

		उदाहरणार्थ व्यक्तीचे उत्पन्न बदलल्यास उपभोग खर्चात मागणी किंवा किंमत पातळीत बदल होतो.
8. अभ्यासाचा केंद्रबिंदू	' किंमत यंत्रणा' हा सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासांचा केंद्रबिंदू आहे. किंमत बदलल्यास मागणी पुरवठ्याचे संतुलनात बदल होतो.	' उत्पन्न 'हा समग्रलक्षी अर्थशास्त्राची अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे उत्पन्नातील बदलाच्या सहाय्याने मागणी पुरवठ्यातील संतुलन स्पष्ट केले जाते
9. मागणी व पुरवठा संबंध	सूक्ष्म अर्थशास्त्रात मागणी व पुरवठा हे दोन्ही घटक स्वतंत्र असतात. मागणीतील बदलाचा पुरवठ्यावर व पुरवठ्यातील बदलाचा मागणीवर परिणाम होत नाही.	समग्र अर्थशास्त्रात समग्र मागणी व समग्र पुरवठा एकमेकांवर अवलंबून असतात. समग्र अर्थशास्त्राची मागणी व पुरवठ्याचे पृथक्करण करून त्यांच्यातील बदलांचा अभ्यास केला जातो.

Busi.Economics HRM

10. साधनसामग्री वितरण	सूक्ष्म अर्थशास्त्रात साधनसामग्री दिलेली आहे. असे गृहीत मानून अर्थव्यवस्थेची अनेक क्षेत्रात विभागणी केली जाते.	समग्र अर्थशास्त्र साधन सामग्रीचे वितरण उपभोग्य वस्तू व भांडवली क्षेत्र अशा दोन भागात केले जाते.
11. सीमांत विश्लेषण	सूक्ष्म अर्थशास्त्रात सीमांत विश्लेषणाचा वापर करून विविध नियम व सिद्धांताची मांडणी केलेली आहे. उदाहरणार्थ घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत,विभाजनाचा सीमांत उत्पादकता सिद्धांत.	समग्र अर्थशास्त्रात सिद्धांताचे स्पष्टीकरण करताना कालबाह्य ठरणाऱ्या सीमांत विश्लेषणाचा त्याग करण्यात आलेला आहे.
12 व्यक्तिनिष्ठ	सूक्ष्म अर्थशास्त्र व्यक्तिनिष्ठ व वस्तुनिष्ठ असून सूक्ष्म अर्थशास्त्र	समग्र अर्थशास्त्र समाजनिष्ठ ,राष्ट्रनिष्ठ असून समग्र

Busi. Economics HRM

व समाजनिष्ठ	होणाऱ्या मानवाचा अभ्यास करते .	अर्थशास्त्र अमर राहणाऱ्या समाजाचा अभ्यास करते.
13. स्थितिशील व गतिशील	सूक्ष्म अर्थशास्त्र हे स्थितिशील असून सूक्ष्म अर्थशास्त्रातील नियम किंवा सिद्धांत विशिष्ट परिस्थितीत लागू होतात.	समग्र अर्थशास्त्र गतिशील आहे. समग्र अर्थशास्त्रात बदलत्या परिस्थितीचे विवेचन केले जाते. समग्र अर्थशास्त्र नियम किंवा सिद्धांत सर्वसाधारण परिस्थितीत लागू होतात.
14. वास्तव व चलनी परिमाणे	सूक्ष्म अर्थशास्त्रात नियम किंवा सिद्धांत याचे स्पष्टीकरण करताना वास्तव परिमाणे वापरले जातात.	समग्र अर्थशास्त्रात चलनी परिमाणांचा वापर केला जातो. वस्तू व सेवांच्या किमती पैशात व्यक्त केल्या जातात.
15. सरकारी धोरण	सूक्ष्म अर्थशास्त्रात सरकारच्या निर्हस्तक्षेप धोरणाचा पुरस्कार केलेला आहे. तत्व व सिद्धांताची	समग्र अर्थशास्त्रात सरकारी हस्तक्षेपाला महत्त्व दिले आहे. समग्र अर्थशास्त्रात तत्व व

Business Economics HRM

	जास्त चर्चा केली जाते. सरकारी धोरण ठरविण्याच्या दृष्टीने सूक्ष्म अर्थशास्त्र निरुपयोगी ठरते.	सिद्धांताची उपलब्धता विचारात घेतली जाते. उदा. राजकोषीय धोरण, अंदाजपत्रकीय धोरण, सरकारी धोरण ठरविण्यास समग्र अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.
16. रोजगार पातळी	सूक्ष्म अर्थशास्त्रात विविध क्षेत्रात रोजगार पातळी कशी ठरते ,वेतनाचे दर कसे निश्चित होतात याचे विवेचन दिले जाते.	समग्र अर्थशास्त्रात रोजगार पातळीत चढ-उतर कसे होतात ,मजुरीचे दर ठरवताना कोणकोणत्या घटकांचा विचार केला जातो. याचे विवेचन दिले जाते.
17. संकुचित व व्यापक	सूक्ष्म अर्थशास्त्र हे समग्र अर्थशास्त्राच्या तुलनेत संकुचित आहे.संपूर्ण जंगलाऐवजी त्यातील एका झाडाचा अभ्यास यामध्ये केला जातो .	समग्र अर्थशास्त्र हे सूक्ष्म अर्थशास्त्र च्या तुलनेत व्यापक आहे . संपूर्ण जंगलाचे परीक्षण केले जाते. हा स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यासविषय आहे.

Busi. Economics HRM

18.स्वरूप	अर्थव्यवस्थेचे एखाद्या सूक्ष्म जंतूच्या दृष्टिक्षेपात येणारे दृश्य असे सूक्ष्म अर्थशास्त्राची स्वरूप आहे.	एकूण समग्रलक्षी अर्थव्यवस्थे चे एखाद्या पक्षाच्या दृष्टिक्षेपात येणारे दृश्य असे अर्थशास्त्राचे स्वरूप असते.

१.२ आर्थिक विश्लेषणाची साधने ः –

(Tools of Economic Analysis)वेगवेगळया घटकांतील संबंध अर्थशास्त्रीय सिध्दांताच्या आधारे स्पष्ट होतात. हे घटक एकमेकांशी संबंधित असतात□त्यांच्यात आंतरसंबंध असतो. अर्थशास्त्रात नियम□निरीक्षणे□प्रवृत्ती□सिध्दांताचा समावेश होतो. सिध्दांत □संकल्पना यातून होणारे अर्थ शोधून काढण्याचा सैध्दान्तिक विश्लेषणाचा प्रयत्न असतो. कोणताही सिध्दांत शब्दांनी वर्णन करून विधानाच्या स्वरूपात सांगता येतो किंवा गणिती चिन्हांच्या सहाय्याने सूत्रस्वरूपात मांडता येतो किंवा आलेखाच्या सहाय्याने सूत्ररूपाने मांडता येतो किंवा आलेखाच्या सहाय्याने व्यक्त करता येतो. म्हणूनच अंशलक्षी अर्थशास्त्राच्या अभ्यासात ही विश्लेषणाची साधने महत्वाची मानली जातात.

Busi.Economics HRM

आर्थिक विश्लेषणाची साधने



अ फलन सबंध ः –

अर्थशास्त्रीय सिद्धांत सामान्यतः मानवाच्या दैनंदिन वर्तन प्रवृत्तीच्या संदर्भात मांडले जातात. अर्थशास्त्र सिद्धांतांमध्ये वेगवेगळ्या संकल्पना व्याख्या काही गृहीत गोष्टी समाविष्ट केलेले असतात. मानवी वर्तणुकीच्या संदर्भात काही निष्कर्ष काढले जात असताना काही विशिष्ट गृहीत परिस्थिती लक्षात घेतली जात असते.या विविध परिस्थितीच्या संदर्भात आर्थिक सिद्धांत खरे ठरू शकतात. अशा गोष्टी शब्दांमध्ये,चिन्हांमध्ये किंवा प्रतीकांच्या सहाय्याने किंवा आकृतीच्या साहाय्याने मांडता

येतात.अर्थशास्त्रीय सिद्धांत मांडण्यासाठी खालील तात्विक विश्लेषण पद्धतींचा वापर केला जातो.

1)शाब्दिक स्वरूपात

2)गणितीय स्वरूपात किंवा

3)भूमितीय स्वरूपात

सर्वच शास्त्रांमध्ये सिद्धांताची मांडणी करत असताना एक गोष्ट दुसऱ्या गोष्टींवर किंवा एक घटक दुसऱ्या घटकावर अवलंबून असतो. असे म्हटले जाते. उदा.गुरुत्वाकर्षण हे दोन वस्तूंचे आकारमान आणि त्या दोन वस्तूंमधील अंतर यावर अवलंबून असते किंवा उत्पादकाकडून केल्या जाणाऱ्या वस्तूंचा पुरवठा वस्तूच्या किंमतीवर अवलंबून असतो. या स्वरूपाचे परस्परांमधील संबंध दर्शवण्यासाठी गणितामधील शब्दांचा आणि संकल्पनांचा वापर केला जातो. अशा वेळी एक गोष्ट दुसऱ्या गोष्टीवर अवलंबून आहे हे व्यक्त करण्यासाठी एक गोष्ट दुसऱ्याचे फलन आहे असा शब्दप्रयोग केला जातो.

1) एखाद्या वस्तूवर परिणाम करणारी गुरुत्वाकर्षण शक्ती ही त्या वस्तूचे आकारमान आणि ती वस्तू आणि तेथे पृथ्वीपासूनचे अंतर यांचे फल आहे.

किंवा

2) वस्तूचा बाजारातील पुरवठा हा त्या वस्तूच्या किमतीचे फलन आहे. ही विधाने शाब्दिक स्वरूपात वरील प्रमाणे मांडली जातात. परंतु या विधानांमध्ये दोन घटनांमधील परस्पर संबंध चिन्हांच्या किंवा यांच्या स्वरूपात मांडता येतो.

Busi.Economics HRM

फलन संबंधाची वैशिष्ट्ये

1. फलन संबंधात दोन किंवा दोनपेक्षा जास्त चलातील परस्परसंबंध दर्शवला जातो.
2. फलन संबंध शाब्दिक, गणितिय किंवा अनेक आलेखाच्या सहाय्याने दर्शवला जातो .
3. फलन संबंध दर्शवताना डाव्या बाजूला परतंत्र चल आणि उजव्या बाजूला स्वतंत्र चल दर्शविले जातात.
4. फलन संबंधात दुसऱ्यावर अवलंबून आहे हे दर्शवण्यासाठी' f 'हे चिन्ह वापरले जाते.
5. फलन संबंधात उजव्या बाजूची चले डाव्या बाजूच्या चलांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी कारणीभूत असतात.
6. भूतकाळातील परस्पर संबंधांच्या आधारे नियोजन करण्यासाठी व्यवस्थापन निर्णय प्रक्रियेत फलन संबंध ही संकल्पना उपयुक्त ठरते.

फलन संबंध व्यक्त करण्यासाठी –

१☐ प्रत्येक घटकाला एक चिन्ह दिले जाते .

२☐ एक घटक दुस–या घटकावर अवलंबून आहे हे व्यक्त करण्यासाठी

Busi.Economics HRM

दुसरे चिन्ह दिले जाते .

<u>**उदा .**</u> उत्पादन हे भूमी□श्रम□भांडवल□संयोजक यांचे एकत्रित कार्य आहे . हे फलनात्मक संबंधाच्या

सूत्राने पुढिलप्रमाणे दाखविता येते .

वस्तूचे उत्पादन फलन □भूमी□श्रम□भांडवल□संयोजक □किंवा O = F (a,l,k,e)

या सूत्रात – O = उत्पादन

F = फलन

a भूमी

l श्रम

हे समीकरण O हे a,l,k,e चे फलन आहे .

किंवा O हे a,l,k,e वर अवलंबून आहे .

k भांडवल

e संयोजक

Busi.Economics HRM

या समीकरणात o,a,l,k,e हे चल आहेत . त्यांना कमी –जास्त अशी किंमत असू शकते .

ब अनुसूची ः –

अर्थशास्त्रामध्ये विविध नियम व सिद्धांताचे सत्यता पडताळून पाहण्यासाठी अथवा एका चलातील बदलाची दुसऱ्या चलातील बदलावर होणाऱ्या परिणामाचे सत्यता पडताळून पाहण्यासाठी माहिती संकलित करण्यासाठी वापरले जाणारे साधन म्हणजे अनुसूची होय. **उदा.**घटत्या उपयोगितेचा नियम, मागणीचा नियम, बदलत्या प्रमाणाचा नियम, घडत्या उपयोगितेचा नियम अभ्यासताना उपभोक्त्यांना वस्तूचे नग क्रमाक्रमाने दिल्यास प्रत्येक नागापासून मिळणाऱ्या उपयोगितेची माहिती उपभोक्ते कडून घेऊन उपयोगिता अनुसूचित जाती अनुसूचित तयार केली जाते.

अनुसूची व्याख्या : -

1) "ज्या प्रश्नमालिकेमधील प्रश्न अभ्यासक मुलाखतदात्यांना प्रत्यक्षपणे विचारून त्यांची उत्तरे भरत असतो त्या प्रश्न मालिकेला अनुसूची असे म्हणतात."

2) "अनुसूची एक अशी प्रविधि आहे की जी विशेषत: सर्वेक्षण प्रणालीच्या अंतर्गत क्षेत्रिय सामग्री एकत्रित करण्यासाठी उपयोगात आणली जाते."

वरील व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, अनुसूची ही एक औपचारिक सुलभ आणि संशोधकाद्वारे प्राथमिक तथ्य संकलनाची एक आवश्यक आवश्यक प्रविधि आहे.

Business Economics HRM

अनुसूची म्हणजे प्रश्नांचे औपचारिक अथवा विशिष्ट विषयाची अनुक्रमांक बनवलेली यादी केव्हा सुरू होऊन या सूचीचा उपयोग जास्तीत जास्त सर्वेक्षणात केला जातो. संशोधन विषयाच्या संबंधित काही प्रश्नांचा अनुसूचीमध्ये विचारपूर्वक सामावेश होतो .उत्तरदात्याकडून या प्रश्नांची उत्तरे मिळाल्यास संशोधन विषयाच्या वास्तवविकतेवर प्रकाश पडू शकतो.अनुसूची किंवा प्रश्नांची यादी घेऊन अभ्यासक प्रत्येक उत्तरदात्याकडे जातो व त्यांना स्वतः प्रश्न विचारून त्या प्रश्नांची स्वतः अनुसूचीमध्ये नोंद करतो. अनुसूचिचा उपयोग संख्यात्मक आकडेवारीच्या संकलनासाठी केला जातो.त्या आकडेवारीच्या आधारावर त्यांचे वर्गीकरण व विश्लेषण करणे अधिक सोयीचे जाते.

अनुसूचीचे गुण आणि फायदे

1. अनुसूचीच्या मदतीने उपभोक्त्याच्या वागणुकीचा अभ्यास करता येतो. उपभोक्त्याच्या वागणुकीच्या मर्यादा दर्शवण्यासाठी अनुसूची चा उपयोग होतो.
2. अनुसूचीच्या माध्यमातून मिळणारी माहिती विश्वसनीय असते.
3. अनुसूचीद्वारे संशोधनकर्ता उत्तरदात्याकडून जास्तीत जास्त माहिती विविध प्रश्नाद्वारे गोळा करतो.
4. अनुसूचीमध्ये पक्षविरहित सामग्रीचे संकलन होते. संशोधनकर्ता उत्तरदातांमध्ये समोरासमोर माहितीचे आदान-प्रदान करतात. संशोधक व उत्तरदातांमध्ये पक्षपात केला जात नाही.
5. अनुसूचीमुळे सांख्यिकीय विश्लेषण करणे सोपे जाते .प्रश्नांची माहिती प्रतिसादक तत्परतेने देतो. त्यामुळे अल्प वळेत सांख्यिकीय विश्लेषण करता येते.

Busi.Economics HRM

अनुसूची दोष किंवा तोटे :-

1. अनुसूची केवळ मर्यादित किंवा लहान क्षेत्राच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरते. मोठे क्षेत्र असल्यास अनुसूची च्या मदतीने माहिती गोळा करणे अवघड जाते.
2. संशोधकाने विचारलेल्या प्रश्नात प्रतिसादकांचे योग्य प्रतिसाद न दिल्यास वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध होणे कठीण असते.
3. प्रतिसादक विखुरलेले व लांब अंतरावर असल्यास त्यांच्याशी संपर्क साधणे अवघड असते.
4. मोठ्या स्वरूपाच्या संशोधनात अनुसूची भरण्यासाठी क्षेत्र कार्यकर्त्यांना प्रशिक्षण द्यावे लागते.
5. अनुसूची पद्धती अधिक खर्चिक आहे. त्यासाठी संशोधकांना प्रवास, खाणेपिणे, राहण्याची व्यवस्था, कार्यकर्ता वेतन इत्यादींवर बराच खर्च करावा लागतो.

सर्वेक्षणातून मिळालेल्या आकडेवारीच्या आधारे किंवा एखादया उदयोगसंस्थेकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीवरून अनुसूची तयार करता येते. वेबस्टर यांच्या मते, "अनुसूची म्हणजे प्रश्नांची औपचारिक अथवा विशिष्ट विषयाची अनुक्रमानुसार बनविलेली यादी किंवा सूची होय."

<u>उदा</u> : मागणी किंवा पुरवठयाच्या नियमासंदर्भात दिलेले पत्रक यालाच मागणी किंवा पुरवठा अनुसूची असे म्हणतात.

Busi.Economics HRM

मागणी अनुसूची

साखरेची किंमत □रु□प्रति कि	साखरेची मागणी□किलो□
५०	३
४०	४
३०	५
१५	७
०५	९

वरील उदाहरणावरून इतर परिस्थिती कायम असताना□साखरेची किंमत वाढत असताना साखरेची मागणी किती असते हे अनुसूचीच्या सहाय्याने दाखविता येते . अशा पत्रकास मागणी अनुसूची असे म्हणतात .

क□आलेख : –

अर्थशास्त्रात विविध घडामोडींबाबत आकडेवारी गोळा केली जाते. गोळा केलेल्या आकडेवारीचे वर्गीकरण सारणी द्वारे दर्शविले जाते. सारणी द्वारे गोळा केलेल्या माहिती किंवा आकडेवारीचे आलेखाद्वारे सादरीकरण केले जाते. आलेख या शब्दाचा अर्थ संस्कृत भाषेत चित्र असा होतो. चित्रदर्शनाच्या साहाय्याने माहिती सांगितली असता अधिक आकर्षक व परिणामकारक होतेव चटकन लक्षात राहते.आलेख दीर्घकाळ लोकांच्या स्मरणात राहतात. म्हणून अलीकडे जाहिरातींसाठी आलेखांचा वापर मोठ्या

Busi.Economics HRM

प्रमाणात केला जातो. जमा केलेली आकडेवारी आकर्षक पद्धतीने मांडण्याची कला म्हणजे आलेख.

***विशिष्ट प्रकारच्या कागदावर दर्शविलेल्या रेषेस,वक्रास किंवा स्तंभास आलेख असे म्हणतात.**

आलेख काढण्याचे तंत्र

आलेख काढण्यासाठी आलेख कागदाचा उपयोग केला जातो. आलेखातील महत्त्वाची बाब म्हणजे 'अक्ष' होय, दोन सरळ रेषा परस्परांना काटकोनात छेदतात त्या देषांना 'अक्ष' असे म्हणतात. हे अक्ष परस्परांना ज्या बिंदूत छेदतात त्या बिंदूला मूळ किंवा उगम किंवा प्रारंभबिंदू असे म्हणतात. या बिंदूचा आरंभ शून्यापासून होतो.सर्वसाधारण क्षितिजसमांतर रेषा x अक्ष,लंबाकृती रेषेला Y अक्ष असे म्हणतात.



आलेखाचे गुण

1. अर्थशास्त्रीय विश्लेषण सोपे करण्याच्या दृष्टीने अर्थशास्त्रातील विविध चलांमधील कार्यात्मक संबंध आलेखाच्या सहाय्याने दर्शविता येतो.
2. संख्यात्मक माहिती आलेखाच्या स्वरूपात दिल्यास माहितीचा बोध चटकन होतो.
3. आकड्यापेक्षा आलेख आकर्षक असतात.या बाबींकडे लक्ष वेधायचे असेल ते योग्य रंगसंगतीने अधिक आकर्षक करता येतात.
4. आलेखातील प्रमुख बाबी लक्ष वेधून घेतात आणि बराच काळ स्मरणात राहतात.
5. आलेखाद्वारे माहितीची तुलना करता येते.
6. तुलनेने आलेखाद्वारे माहिती कमी खर्चात दर्शविता येते.
7. आलेखातील माहितीच्या तुलनात्मक अभ्यासासाठी आणि निष्कर्ष काढण्यासाठी उपयोग होतो.

आलेखाचे दोष / तोटे

1. तक्यामध्ये सर्व आकडे असतात.आलेखात बरीच माहिती वगळली जाते. मूळ बाबीची पूर्ण कल्पना येत नाही.
2. एका तक्त्यात बरीच माहिती देता येते.आलेखात तसे करता येत नाही.
3. आलेखात दोनपेक्षा जास्त चलांमधील संबंध दर्शविताना क्लिष्टता येते. परस्परसंबंधाचे भाष्य करणे जास्त कठीण होते.

Busi.Economics HRM

दोन चलांतील फरक स्पष्ट करण्यासाठी एकाच आलेखावर दोन्ही गोष्टींचे प्रदर्शन करता येते. दोन्हींच्या स्तरांना एकाच भुजेवर प्रदर्शित करून आलेख तयार केला जातो. केवळ वेगवेगळया प्रदर्शनांकरिता एकाच आलेखावर वेगवेगळया रेषांचा उपयोग केला जातो. पुराव्यासाठी घेतलेली आकडेवारी उपयोगात आणून आलेख काढता येतो. आलेखाच्या मदतीने दोन किंवा दोनपेक्षा जास्त चलातील परस्पर संबंध दृश्य स्वरूपात स्पष्ट होतो.



ड) समीकरणे :-

अर्थशास्त्रीय विश्लेषणात फलनसंबंध शाब्दिक स्वरूपात व्यक्त केला जातो. तेव्हा या फलना संबंधीची समीकरणाच्या साहाय्याने गणिती स्वरूपात मांडणी केली जाते. समीकरणांच्या मदतीने विविध चलांच्या किमती टाकून दोन चलांमधील परस्पर संबंध स्पष्ट करता येतो व एका चलाच्या अनुषंगाने दुसऱ्याच्या चलात होणारा बदल शोधून काढता येतो.

" जेव्हा समानता संबंधात चलाचा सामावेश होतो तेव्हा त्या समानता संबंधाला समीकरण असे म्हणतात."

" जो संबंध केवळ विशिष्ट संख्यात्मक किमतीच्या संदर्भातच सत्य असतो अशा संबंधांना समीकरण असे म्हणतात."

समानता संबंधाचे सर्व गुणधर्म समीकरणाला लागू पडतात.समीकरणातील समानतेला दोन बाजू असतात. त्यातील ' = ' या चिन्हाच्या डावीकडील राशी म्हणजे त्याची डावी बाजू आणि उजवीकडील राशी म्हणजे उजवी बाजू दोन्ही बाजू तराजूच्या याप्रमाणे समानता दर्शवतात.

अर्थशास्त्रीय विश्लेषणात समीकरणाचे उपयोग किंवा महत्व :-

1) अर्थशास्त्रात गृहीत कल्पनांच्या चाचणीसाठी समीकरणाचा वापर केला जातो.
2) फलन संबंधातील शाब्दिक उदाहरणे समीकरण मांडून सोडविता येतात.
3) रेषीय आणि वर्गसमीकरणावरून फलन संबंध रेषीय आहे की अरेषीय आहे हे समजायला मदत होते .
4) समीकरणातील एका चलाचे मूल्य माहित असल्यास दुसऱ्या चला चे मूल्य शोधून काढता येते. एका चलातील बदलाच्या अनुषंगाने दुसऱ्या चलात किती प्रमाणात बदल होतो हे समजते.

Busi.Economics HRM

5) दोन जणांमध्ये परस्पर संबंध कसा आहे हे समजून घेण्यासाठी समीकरणाचा उपयोग अर्थशास्त्रात होतो

उदा ः –

$$15x-12 = 13x+18$$

$$15x-13x = 12+18$$

$$2x = 30$$

$$X = 30/2$$

$$X = 15$$

1.5 मूलभूत संकल्पना : कुटुंबे, उपभोक्ता, उद्योगसंस्था संयंत्र व उद्योग

सूक्ष्म व समग्र अर्थशास्त्र मध्ये नियमितपणे वापरल्या जाणाऱ्या या संकल्पना आहेत. अर्थव्यवस्थेच्या एकूण कार्यप्रणालीमध्ये या संस्थांचा सहभाग असतो. किंबहुना, अर्थव्यवस्थेतील सर्वच व्यवहार या संस्थांमार्फत संक्रमित होत असतात. त्यांच्या सहभागामुळेच अर्थव्यवस्थेचे कार्य चालत असते. म्हणून अर्थशास्त्राचा अभ्यास करताना या संस्थांचा अर्थ, त्यांचे कार्य, कसे चालते, त्यांचे व्यवस्थेतील स्थान काय आहे, याचा अभ्यास करणे अनिवार्य ठरत असते.

Business Economics HRM



कुटुंब (Households)

अर्थशास्त्रातील मूलभूत संकल्पना आहे. कुटुंबे म्हणजे एका घरामध्ये राहणाऱ्या व्यक्तींचा गट किंवा समूह. तसाच काहीचा अर्थ अर्थशास्त्र मध्येही घेतला जातो. परंतु, आर्थिक दृष्टिकोनातून अर्थशास्त्रामध्ये कुटुंबाकडे आर्थिक दृष्टिकोनातून बघितले जाते. तो दृष्टिकोन म्हणजे कुटुंब उत्पादन घटकांचा पुरवठा केन्द्र आहे. त्याचप्रमाणे वस्तू व सेवांची मागणी करणारे केंद्रदेखील आहे. कुटुंब आपल्याकडे असलेल्या श्रमाचा, भूमीचा, भांडवलाचा,पुरवठा संस्थांकडून करते. उद्योगसंस्था उत्पादन घटकांचे मोबदला कुटुंबांना देतात. म्हणजेच कुटुंबांकडून उद्योग संस्थांकडे उत्पादन घटकांचा प्रवाह उद्योग संस्थांकडून कुटुंबांकडे वस्तू व सेवांचा प्रवाह सुरू होतो.दुसऱ्या बाजूने बघितल्यास उद्योग संस्था कुटुंबांना वस्तू व सेवांचा पुरवठा करतात.त्याची किंमत उद्योगसंस्था पैशांमध्ये मोजतात. म्हणजेच कुटुंबांकडून उद्योग संस्थांकडे उत्पन्नाचा

Business Economics RM

प्रवाह सुरू होतो. यालाच उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह असे म्हणतात. कुटुंबांकडून जास्तीच्या उत्पन्नाची बचत केली जाते. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील एकूण बचत पातळीमध्ये बदल होऊन त्याचा व्याजदरावर परिणाम होतो. की देशातील गुंतवणूक पातळीत बदलते. व त्याचा एकूण आर्थिक विकासावर परिणाम होतो. अशा अनेक अंगाने कुटुंब संस्थेचा विचार अर्थशास्त्रामध्ये करावा लागतो.

उपभोक्ता (Consumer)

अर्थशास्त्रामध्ये उपभोक्ता या घटकाला खूप महत्त्व आहे. अर्थव्यवस्थेमधील सर्वच आर्थिक व्यवहार पसंतीला उपभोक्त्याच्या सभोवती फिरत असतात असे म्हटले तरी ती चूक ठरणार नाही. त्यामुळे उपभोक्त्याच्या व त्याच्या निर्णयाला खूप महत्त्व असते. जर एखाद्या उत्पादकाने उपभोक्त्याचे मत विचारात घेतले नाही तर त्याला प्रचंड आर्थिक नुकसानीला तोंड द्यावे लागते. म्हणून अर्थशास्त्रामध्ये उपभोक्त्याच्या वर्तनाचा अभ्यास अग्रक्रमाने केला जातो .उपभोक्ता म्हणजे अशी व्यक्ती जी बाजारामध्ये स्वतःच्या अंतिम उपभोगासाठी वस्तू खरेदी करत असते. उपयुक्त वस्तू खरेदी करून त्यावर प्रतिक्रिया करुन तिच्या मांडण्यांमध्ये किंवा स्वरूपामध्ये बदल करून बाजारातील विक्री मूल्यात वाढ करून नफा मिळवण्यासाठी त्या वस्तूंची विक्री करत नाही. स्वतःची गरज भागवण्यासाठी तो वस्तू खरेदी करत असतो. याच दृष्टिकोनातून बाजारातील सर्वच घटक उपभोक्त्याकडे बघत असतात.अर्थव्यवस्थेत उपभोक्ता असेल तरच उत्पादन, वितरण, गुंतवणूक, वितरण, जाहिरात, कामगारांना वेतन, रोजगार या सर्व क्रिया घडून येत असतात. यापूर्वी म्हटल्याप्रमाणे उपभोक्त्याभोवतीच सर्व आर्थिक क्रिया करत

Business Economics HRM

असतात.त्याची आर्थिक व्यवस्थेत अनुपस्थिती असेल किंवा त्याच्या जर काही अडचणी असतील तर सर्व आर्थिक क्रिया ठप्प होत असतात. म्हणून उपभोक्त्याच्या पसंत पडेल किंवा त्याचा कल काय आहे या गोष्टींना खूप महत्त्व आहे .भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये उपभोक्त्यांना पूर्ण स्वातंत्र्य असते.त्याच्या मर्जीनुसार वस्तू व सेवा यांचे उत्पादन होत असते. परंतु असे समाजवादी अर्थव्यवस्थेत होत नाही. समाजवादी अर्थव्यवस्थेत बाजारपेठेतील निर्णयानुसार उत्पादन होत नाही ,तर केंद्रीय नियोजन मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार उत्पादन व उत्पादनाच्या किमती ठरत असतात. सरकारने बाजारपेठेत केलेल्या हस्तक्षेपामुळे किंवा केलेल्या कायद्यामुळे उपभोक्त्याच्या स्वातंत्र्याला इजा पोहचत असते. त्यामुळे कोणत्या वस्तूंचा उपभोग घ्यावा किंवा किती प्रमाणात घ्यावा यावर सरकार वेगवेगळे कर आणि कायदे करून किंवा इतर काही मर्यादा घालून स्वातंत्र्याला बाधा आणत असते.

असे जरी असले तरी एक गोष्ट मात्र लक्षात घेतली पाहिजे की, काही असले तरी एकूण आर्थिक व्यवहार चक्रामध्ये उपभोक्ता या आर्थिक एककाभोवतीच सर्व व्यवहार फिरत असतात.फक्त एक बाब महत्त्वाची आहे, ती म्हणजे बाजारात पूर्ण स्पर्धा जेवढी अधिक तेवढे उपभोक्त्याचे हित अधिक समजले जाते.आणि जसजशी अपूर्ण स्पर्धा वाढत जाते किंवा स्पर्धेत बाधा येत जाईल तसतशी ग्राहकांची कल्याणपातळी किंवा हित हे कमी होत असते.

उद्योग संस्था (Firm)

अर्थशास्त्रामध्ये उद्योगसंस्थेला महत्त्वाचे स्थान आहे. कारण उद्योग संस्थेमार्फत सर्व व्यवस्थापकीय निर्णय घेतले जात असतात, सर्वसाधारण भाषेत वस्तूंचे उत्पादन

Busi. Economics HRM

किंवा सेवा पुरवणारे एक एकक म्हणून ओळखले जाते. अर्थशास्त्रामध्ये उद्योग संस्थेची व्यापकता खूप मोठी आहे .

उद्योग संस्थेची व्याख्या

" दिलेल्या तंत्रज्ञानामध्ये वस्तू व सेवांच्या निर्मितीसाठी उत्पादन घटकांची नियुक्ती करणारे एकक म्हणजे उद्योग संस्था होय".

"स्वतंत्रपणे व्यवस्थापित केले जाणारे व्यवसायिक एकक म्हणजे उद्योगसंस्था"

"कोणत्या वस्तूंचे आणि कसे उत्पादन करावे असे निर्णय व नियंत्रण करणारे केंद्र म्हणजे उद्योगसंस्था ."

" उद्योगसंस्था ही स्वतंत्र संघटन व्यवस्था आहे की जिचे वस्तू व सेवा यांचे उत्पादन करणे हे अंतिम ध्येय असते."

या सर्व व्याख्या वेगवेगळ्या कालावधीमध्ये केल्या गेलेल्या आहेत त्या मार्फत उद्योगसंस्थांना भेडसावणाऱ्या समस्यांवर भर देण्यात आला आहे.या व्याख्यांवरून उद्योग संस्थेची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1. उद्योग संस्था आहे अशी जागा आहे की जिथे वस्तूंचे उत्पादन संबंधित निर्णय घेतले जातात. उदाहरणार्थ कोणत्या वस्तूंचे आणि कसे उत्पादन करावे यासंबंधी निर्णय.
2. उद्योगसंस्था ही अशी जागा आहे जिथे वस्तूंच्या उत्पादनासाठी श्रम या उत्पादन घटकांचा उपयोग किंवा वापर केला जातो .

Busi.Economics HRM

3. उद्योगसंस्था ही अशी जागा आहे की जिथे सर्व उत्पादन घटक उत्पादनासाठी एकत्र आणले जातात .उत्पादनाबरोबरच उत्पादित वस्तूंची विक्री व वितरण देखील एकत्र केले जाते.
4. उद्योगसंस्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या उत्पादन तंत्राचे स्वरूप हे उद्योग संस्थेच्या उत्पादनावर अवलंबून असते.

उत्पादन आणि वितरण या संबंधित सर्व कामे उद्योग संस्थेला एकाच वेळेला करायचे असतात. नफा मिळवण्यासाठी उद्योग संस्था ग्राहकांच्या मागणीनुसार वस्तूंचे उत्पादन करत असते. पारंपारिक नफा मिळवणे हे उद्योग संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असते. प्रत्येक कालावधीमध्ये उद्योग संस्था महत्तम नफा मिळवण्याचा प्रयत्न करते. परंतु औद्योगिक संस्थांच्या हे लक्षात आले आहे की वर्तमान काळात नफा होतो की तोटा होतो यापेक्षा दिर्घळात महत्तम नफा होतो की नाही याचा विचार उद्योग संस्था करतात.

सयंत्र (Plant)

सयंत्र ही संकल्पना जिथे वस्तूंचे प्रत्यक्ष उत्पादन केले जाते किंवा एखादी विशिष्ट प्रक्रिया केली जाते त्या ठिकाणाशी संबंधित आहे. उदाहरणार्थ अझीझ पाईप कारखाना साखर कारखान्यातील अल्कोहोल निर्मिती प्रकल्प.यावरून असे म्हणता येते की जिथे वस्तूंची निर्मिती होते त्या ठिकाणाहून वस्तूंचे वितरण होते. किंवा वस्तूंचा पुरवठा केला जातो. त्याला संयंत्र असे म्हणता येते.

Busi. Economics HRM

एका उद्योग संस्थेअंतर्गत अनेक संयंत्र समाविष्ट होतात .उदाहरणार्थ साखर कारखाना उद्योगसंस्था आहे. समजा साखर कारखाना व्यवस्थापन मंडळाने ठरविले की कारखान्यांमधील मळी अल्कोहोल निर्मिती आणि चिपाडापासून कागद निर्मिती केल्यास साखर कारखान्यांमधील मळी आणि चिपाडे वाया जातात ,त्याचा वापर तर होईलच आणि मळी व कागदापासून जास्तीचे उत्पन्नही मिळेल. तसेच त्याच्या बंदोबस्तासाठी वेगळा खर्चही करावा लागतो. या सर्व बाबी लक्षात घेऊन साखर कारखान्याचे व्यवस्थापन मंडळ अल्कोहोल व कागद निर्मिती प्रकल्पांना मंजुरी देऊन तेथे कागद निर्मिती प्रकल्प व अल्कोहोल प्रकल्प ही दोन्ही सयंत्र आहेत.

एकंदरीत संयंत्र ही एक तांत्रिक संकल्पना आहे. येथे एक तांत्रिक प्रक्रिया पार पाडली जाते. मोटार निर्मिती प्रकल्पात अनेक टप्प्याटप्प्याने वेगवेगळ्या सुट्या भागांची निर्मिती किंवा एक विशिष्ट प्रक्रिया पूर्ण केली जाते. त्यामुळे मोटारकार निर्मिती प्रकल्पात अनेक सयंत्र यांचा समावेश होऊ शकतो.

उद्योग (Industry)

समान किंवा एकाच प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योग संस्थांच्या समूहाला उद्योग असे म्हणतात. उदा. साखर उद्योग, कापड उद्योग ,सिमेंट उद्योग, उद्योग हे किरकोळ किंवा द्रव स्वरुपात चालवले जात असतात.किरकोळ उद्योगात उद्योगसंस्था ग्राहकांना प्रत्यक्ष स्वरुपात वस्तू किंवा सेवांचा पुरवठा करीत असतात. तर काही भागात उद्योग संस्थांमार्फत वस्तू किंवा सेवांचा पुरवठा

Busi.Economics HRM

करतात. तेव्हा उद्योगांमध्ये उद्योग संस्था ग्राहकांना किंवा इतर उद्योगांमार्फतच सेवा पुरवत असतात. यामध्ये बँक व विमा उद्योगांचा समावेश करता येतो. एखाद्या देशाची अर्थव्यवस्था आणि उद्योग यानुसार वेगवेगळ्या भागात विभागले जाते. उद्योगसंस्था व उद्योग यांमधील संबंध कोणत्या प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन केले जाते किंवा उत्पादनांची प्रक्रिया कशी आहे यावर अवलंबून असते. यावरून असे लक्षात येते की उत्पादन प्रक्रिया खनन वस्तूंचे परिवर्तन किंवा रूपांतरण या वेगवेगळ्या व्यवसायिक क्रियाशील उद्योग ही संकल्पना निगडित आहे.

उद्योगसंस्था / व्यवसाय संस्थेची ध्येये / उद्दिष्टे

Goals of Firms

व्यवसायिक अर्थशास्त्रात उद्योगसंस्थांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास केला जातो. व्यवसायिक अर्थशास्त्राला उद्योगसंस्थेचा सिद्धांत किंवा उद्योग संस्थेचे अर्थशास्त्र असेही संबोधले जाते. काळाच्या ओघात उद्योगसंस्थेच्या स्वरूपात व संघटन पद्धतीत बदल झाल्याने उद्योग संस्थेची सर्वमान्य होईल अशी एक व्याख्या देता येत नाहि.

उद्योगसंस्थेच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे-

"फायदा मिळवण्याच्या हेतूने निर्माण केलेली संघटना म्हणजे उद्योगसंस्था होय."

जे.एल.डीन

"उत्पादन कशाचे आणि कसे करायचे याविषयी निर्णय घेणारे केंद्र म्हणजे उद्योगसंस्था होय".

केर्नक्रास

Busi. Economics HRM

"व्यवसायासाठी जेथे उत्पादन साधने गोळा केली जातात आणि त्यांचा योजनापूर्वक वापर केला जातो. असे केंद्र म्हणजे उद्योगसंस्था"

एडवर्ड आणि शेण्ड

उद्योग संस्थेची वैशिष्ट्ये

1. कोणत्या वस्तूंचे किती प्रमाणात कसे व कोठे उत्पादन करावे याविषयी निर्णय घेणारे केंद्र होय.
2. उत्पादनासाठी उत्पादन साधने विकत किंवा भाडेतत्त्वावर घेऊन त्यांचा वापर करणारे केंद्र .
3. उत्पादन साधनांची जमवाजमव करून प्रत्यक्ष वस्तूंचे उत्पादन करून विक्री करणारे केंद्र .
4. उत्पादनाविषयी सर्व प्रकारची धोरणे ठरवणारे केंद्र म्हणजे उद्योग संस्था
5. सर्व उत्पादन यशस्वी कसे होईल याविषयी सविस्तर विचार करून निर्णय घेणारी केंद्र होय.

उद्योग संस्थेची स्थापना करताना उद्योग संस्थेच्या पातळीवर विविध उद्दिष्टे निश्चित केली जातात .

उद्योग संस्थेच्या उद्दिष्टांचे दोन गटात वर्गीकरण केले जाते .

1)आर्थिक उद्दिष्टे आणि

2) आर्थिकेतर उद्दिष्टे

Busi.Economics HRM

आर्थिक ध्येय उद्दिष्टे

आर्थिक उद्दिष्टे उद्योग संस्थेच्या वृद्धी विकास व अस्तित्वाशी तसेच भागधारकांचे कल्याण व व्यवस्थापनाच्या उपयोगिता महत्त्व कमी करण्यासाठी निगडित असतात. उद्योग संस्थेची काही प्रमुख आर्थिक उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1. नफा महत्तमीकरण

2. भागधारकांच्या संपत्तीचे महत्तमीकरण

3. व्यवस्थापन मोबदला उपयोगिता महत्तमीकरण

4. उद्योगसंस्थेची वृद्धी

5. विक्री महत्तमीकरण

6. दीर्घकालीन उत्तरजीवित्व

Business Economics RKM

1. नफा महत्तमीकरण

उद्योगसंस्थेच्या परंपरागत विश्लेषणानुसार त्याचे महत्त्व कमी करणे हे उद्योग संस्थेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. जेव्हा एकूण प्राप्तीचे महत्तमीकरण होते व एकूण खर्च ते न्यूनतमीकरण होते तेव्हा नफा हे उद्दिष्ट साध्य होते. जेव्हा व्यवस्थापकीय निर्णय घेताना प्राप्तीत वाढ होत असताना समप्रमाणात खर्च वाढत नाही किंवा प्राप्तीत घट न होता उत्पादन खर्च घटत असेल तर नफ्यामध्ये वाढ होते.

अल्पकाळाप्रमाणेच दीर्घकाळासाठी नफा कमी करण्याचे उद्दिष्ट उद्योग संस्था साध्य करण्याचा प्रयत्न करतात.

अल्पकाळात काही खर्च स्थिर असतात तर सर्व खर्च बदलत असतात, जेव्हा उद्योग संस्था उत्पादनाचे कार्य हाती घेतले तेव्हा सर्वच खर्च भरून निघाले पाहिजे. उद्योग संस्थेने उत्पन्न उत्पादनाच्या अतिरिक्त मात्र यातून अतिरिक्त खर्च भरून काढला पाहिजे.

नफा महत्तमीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी **सीमांत प्राप्ती = सीमांत** या अटीची पूर्तता झाली पाहिजे.

जेव्हा सीमांत प्राप्ती सीमांत खर्च बरोबर होते तेथे उद्योगसंस्थेचे संतुलन प्रस्थापित होते. तेव्हा शेवटच्या उपभोक्त्यांमुळे उद्योगसंस्थेच्या नफ्यात काहीही भर पडत नाही. या उत्पादन पातळी नंतर उत्पादन वाढवल्यास प्राप्तीच्या तुलनेत खर्चात वाढ होते व उद्योगसंस्थेला उत्पादन करणे फायदेशीर ठरत नाही.
थोडक्यात नफा महत्तमीकरण करण्यासाठी उद्योग संस्थेने असे किंमत उत्पादन संयोग निवडावे की ज्यामुळे शेवटच्या एककाची सीमांत प्राप्ती त्या एकदाच्या सीमांत खर्च बरोबर झाली पाहिजे.

२) भागधारकांच्या संपत्तीचे महत्तमीकरण

सामान्य भागधारक हे उद्योग संस्थेचे मालक असतात. त्यांनी धोका पत्करून उद्योगसंस्थेसाठी भांडवल पुरवलेले असते. उद्योगसंस्थेचे अस्तित्व व वाढ भागधारकांनी पुरवलेल्या भांडवलावर अवलंबून असते. भागधारकांना आपले भागभांडवल सुरक्षित

Business Economics HRM

राहावे व त्यावर योग्य प्रमाणात लाभांश मिळावा अशी अपेक्षा असते. भागधारकांच्या हितसंबंधांची जपणूक व्हावी,भागधारकांचा विश्वास संपादन करता यावा यासाठी उद्योगसंस्था भागधारकांच्या संपत्तीच्या महत्तमीकरणाचे ध्येय विचारात घेऊन भागधारकांच्या पैशाचा योग्य विनियोग करून भागधारकांना विविध मार्गाने जास्तीत जास्त लाभ मिळवून देतात. भागधारकांनी पुरवलेल्या भांडवलाची योग्य पद्धतीने गुंतवणूक करून त्यांना लाभांशाच्या रूपाने योग्य तो मोबदला मिळवून दिला जातो. बँकांकडून ठेवीवर मिळणाऱ्या व्याजापेक्षा लाभांशाच्या रूपाने दिला जाणारा मोबदला जास्त राहण्यासाठी उद्योगसंस्था प्रयत्नशील असतात. भागधारकांना नियमितपणे लाभांशाचे वाटप करण्याचा हा प्रयत्न या दृष्टीने उद्योगसंस्था करतात.

3) व्यवस्थापन मोबदला उपयोगिता महत्तमीकरण

मोठ्या आधुनिक व्यवसाय संस्थांमध्ये भागधारक व व्यवस्थापक हे स्वतंत्र गट असतात. भागधारकांना त्यांच्या गुंतवणुकीवर महत्तम परताव्याची अपेक्षा असते. तर व्यवस्थापनाला महत्तम लाभ अपेक्षा उपयोगिता व्यवस्थापन मोबदला उपयोगिता महत्तमीकरण करण्याचे ध्येय जास्त महत्वाचे वाटते. उपयोगिता महत्त्व कमी करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व्यवस्थापकांना कर्मचाऱ्यांची संख्या वाढावी. कर्मचाऱ्यांवरील खर्च वाढवावा. कर्मचाऱ्यांना जास्तीत जास्त सोयी सवलती मिळाव्यात असे वाटते. प्रा. विल्यम्सन यांनी सन 1964 मध्ये उपयोगिता महत्तमीकरण या ध्येयाला "नफा महत्तमीकरण" या उद्दिष्टापेक्षा जास्त महत्त्व दिले. उपयोगिता महत्तमीकरण उद्दिष्टांची पूर्ती पुढील तीन मार्गांनी केले जाते.

Busi. Economics HRM

1) एक व्यवस्थापकांना आपल्या व्यवसाय संस्थेतील कर्मचाऱ्यांची संख्या व त्यांच्या वेतनावरील खर्चात वाढ व्हावी.कर्मचाऱ्यांची संख्या वाढल्यास व्यवस्थापकांचे वेतन वाढ होते.त्यांना जास्त प्रतिष्ठा व सुरक्षितता प्राप्त होते .

2)उपयोगिता महत्तमीकरणाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी व्यक्तिगत सचिव म्हणून नियुक्ती, कंपनीची गाडी ,बंगला ,दूरध्वनी याबाबतीत महत्त्व दिले जाते. होणाऱ्या खर्चाला "व्यवस्थापन शिथिलता" असे म्हणतात.

3) व्यवस्थापकास त्याला योग्य वाटणाऱ्या कंपनीच्या प्रकल्पांना कर्ज आणि प्रोत्साहन उपलब्ध करून देण्यासाठी निधी निर्माण करू इच्छितात .

4)उद्योगसंस्थेची वृद्धी

आधुनिक उद्योगसंस्थांचे व्यवस्थापक नफा महत्तमीकरणापेक्षा वृद्धि महत्तमीकरण या ध्येयाला महत्त्व देतात.श्रीमती पेनरोज यांच्या या मताचे रॉबिन मॉरीस यांनी समर्थन केले.मॉरीस यांच्या मते मोठ्या उद्योग संस्थेच्या व्यवस्थापकाचे उद्दिष्ट उद्योग संस्थेची वृद्धी व सुरक्षितता हे असते. व्यवसाय संस्थेच्या वृद्धीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उद्योगसंस्था आपल्या आकारमानात वाढ करण्याचा प्रयत्न करते ,त्यासाठी नवीन उत्पादित वस्तूंची मागणीनुसार निर्मिती करून नवीन बाजारपेठांचा शोध घेते.

व्यवसाय संस्थेच्या वृद्धीचे उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी इतर उद्योग संस्था ताब्यात घेणे हा मार्ग निवडला जातो.ज्या उद्योगसंस्थांची मालमत्ता अकार्यक्षमपणे वापरली जाते.ती उद्योगसंस्था मूळ उद्योग संस्था आपल्या ताब्यात घेते.

Busi.Economics HRM

उद्योग संस्थेची वृद्धी स्थिर दराने करण्याचा व्यवस्थापकाचा प्रयत्न असतो. विक्री, नफा व मालमत्तेत स्थिर दराने वृद्धी केली जाते. जर वृद्धीचा दर उच्च ठेवण्याचा प्रयत्न केला तर मागणीत वृद्धी करण्यासाठी व्यवस्थापकांना जाहिरात, संशोधन व विकासावर जास्त खर्च करावा लागतो. चालू नाफ्याचा जास्त भाग व्यवसाय संस्थेच्या वृद्धीवर खर्च होतो. भागधारकांना लाभांश घटून भागांच्या किमती घटतात.म्हणून व्यवस्थापक अशा वृद्धीदराची निवड करतात. ज्या दरामुळे बाजारमूल्याचे महत्त्वमीकरण होईल आणि त्याच दराला इतर उद्योगसंस्था ताब्यात घेतल्या जातील.

5)विक्री महत्त्मीकरण

प्रा.बाऊमोल यांनी सन 1982 मध्ये उद्योगसंस्थेच्या व्यवस्थापकाचे मुख्य उद्दिष्ट नफ्याऐवजी विक्रीचे किंवा विक्रीप्राप्तीचे महत्त्वमीकरण करणे हे असते असे मत व्यक्त केले.प्रा.बाऊमोल यांच्या मते मालकी व नियंत्रणाच्या विभक्तीकरणामुळे व्यवस्थापकाचे उच्च वेतन व प्रतिष्ठान नफ्याएवजी उद्योगसंस्थेच्या विक्रीतील वाढीशी निगडितच असते. व्यवस्थापक व्यवसायसंस्थेच्या प्रगतीची मागील काळाशी तुलना करता विक्रीत किती वाढ झाली यावरून करतात. उद्योग संस्थेचे प्रत्यक्ष वर्तन नफा महत्त्वमीकरण्यापेक्षा प्राप्ती किंवा विक्री महत्त्व करण्याची निगडित असते .उद्योग संस्था विक्रीत घट होताना विक्रीच्या आकारमानाला जास्त महत्व देतात.जेव्हा विक्रीचे आकारमान मोठे असते तेव्हा व्यवसाय संस्थेच्या आकारमानाचा विस्तार होऊन नफा मोठ्या प्रमाणात प्राप्त होतो.विक्रीचे महत्त्वमीकरण म्हणजेच उद्योगसंस्थेच्या एकूण प्राप्तीचे महत्त्व.

Busi.Economics HRM

6) दीर्घकालीन उत्तरजीवित्व

अस्तित्व टिकवणे हे उद्योग संस्थेचे एक मुख्य उद्दिष्ट असते. उद्योगसंस्थेला या उद्दिष्टांची पूर्ती करण्यातच रस असतो.अशी पुष्टी या उद्दिष्टांच्या समर्थनार्थ फेलनर यांनी दिलेली आहे.आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी उद्योग संस्थेला सतत संघर्ष करावा लागतो. अस्तित्वाचे सातत्य टिकवून ठेवणे हे उद्योग संस्थेचे उद्दिष्ट असते. उद्योग संस्थेच्या सिद्धांताची बांधणी करताना उद्योगसंस्थेला अस्तित्वावर अधिक लक्ष केंद्रित करावे लागते.

पुढील पाच अस्तित्व कार्यावर या उद्दिष्टांची पूर्ती अवलंबून असते. उद्योगसंस्थेची स्थापना करताना अस्तित्व टिकवण्यासाठी उद्दिष्टे निश्चित केली जातात. त्यामध्ये नफा ,वृद्धी ,ख्यातिमूल्य, उत्पादनाची गुणवत्ता आणि बाजाराचा योग्य वाटा.या पाच उद्दिष्टांमध्ये योग्य समतोल साधल्यास दीर्घकाळात उद्योग संस्थेला आपले अस्तित्व टिकवून ठेवता येते.

अल्पकाळात उद्योगसंस्था किंवा नफा मिळावावा असा प्रयत्न करत नाही. परंतु दीर्घकाळात महत्त्व कमी होण्याऐवजी त्यांची उत्तरे उच्चतम पातळी गाठण्याचा प्रयत्न करते. नफ्याच्या या पातळीमुळे दीर्घकाळात उद्योग संस्थेचे वृद्धी होते. उद्योगसंस्था आपले ख्यातीमूल्य टिकवून ठेवते. हि उद्योगसंस्थेची महत्त्वाची संपदा असते. उत्पादनांच्या दर्जात सुधारणा केल्याने अथवा उत्पादनाचा दर्जा टिकवून ठेवल्यामुळे समाजात उद्योग संस्थेची स्वतःची चांगली प्रतिमा निर्माण होते. एकदा उद्योगसंस्थेचा नावलौकिक प्राप्त झाला तर बाजारातील एकूण विक्रीत उद्योगसंस्थेचा वाटा जास्त राहतो आणि उद्योग संस्थेला आपल्या अस्तित्वाची खात्री राहते.

Busi.Economics HRM

आर्थिकेतर ध्येय / उद्दिष्ट

उद्योगसंस्था आर्थिक उद्दिष्टांबरोबरच काही राजकीय सामाजिक व मानवतावादी उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करते. यांना आर्थिकेतर उद्दिष्ट असे म्हणतात. यामध्ये प्रामुख्याने पुढील तीन ध्येयांचा समावेश होतो.

आर्थिकेतर ध्येय

1. **राजकीय सत्ता आणि प्रतिष्ठा**
2. **सामाजिक जबाबदारी व कल्याण**
3. **कर्मचारी ख्यातिमूल्य**



1) राजकीय सत्ता आणि प्रतिष्ठा

देशातील राजकीय विचारसरणी व सरकारच्या धोरणांचा उद्योग संस्थेच्या कामकाजात प्रभाव पडतो. सत्ताधारी पक्षाच्या आर्थिक व राजकीय धोरणामुळे व्यवसाय संस्थेच्या विकासाची दिशा निश्चित होते. सरकारची करविषयक धोरणे , मक्तेदारी नियंत्रण, समतोल, प्रादेशिक विकासाचे धोरण, खाजगीकरणाचे धोरण ,औद्योगिक धोरणे इत्यादींचा व्यवसाय संस्थेच्या कामकाजावर परिणाम होतो. सन 1991 नंतरच्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या नवीन औद्योगिक धोरणाचा खाजगी क्षेत्रातील उद्योगांच्या विकासावर सकारात्मक परिणाम राम झालेला आहे. सरकारची धोरणे आपल्याला अनुकूल व्हावीत म्हणून उद्योजक स्वतः राजकीय पक्षांना देणग्या देतात. राजकीय पक्षांच्या मदतीने संसदेत आपले प्रतिनिधित्व करतात.तरी कायद्याच्या चौकटीत राहून जास्तीत जास्त लाभ प्राप्त करतात. तर काहि सवलतीचा लाभ अनुदाने व आर्थिक साहाय्य मिळवितात.सरकारला निर्यात धोरण ,औद्योगिक धोरण ठरवण्यासाठी मदत करतात. देशातील बेकारी, उत्पन्न विषमता आणि निरक्षरतेचे समस्या सोडवण्यासाठी सरकारला मदतही करतात.उद्योगसंस्थेच्या व देशाच्या विकासासाठी देशात राजकीय स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतात. नैसर्गिक संकटांच्या काळात भूकंप, चक्रीवादळ ,सरकारची व जनतेची सहानभूती संपादन करण्यासाठी आर्थिक मदत व इतर सहाय्य करुन समाजात एक वेगळी प्रतिष्ठा निर्मा

Busi.Economics HRM

2) सामाजिक जबाबदारी व कल्याण

व्यवसायसंस्था समाजाचा एक घटक आहे. व्यवसायसंस्था नफा मिळविण्याचे उद्दिष्ट साध्य करताना सामाजिक खर्चाकडे दुर्लक्ष करतात व त्यांच्या स्थानिकीकरणमुळे प्रदूषणाचे प्रश्न ,गलिच्छ वस्त्या ,राहण्याच्या जागेचा प्रश्न, वाहतूक, गुन्हेगारि प्रश्न निर्माण होतात.हे प्रश्न सोडवण्याची जबाबदारी समाजाचा एक घटक या नात्याने उद्योगसंस्थांवर आहे. सामाजिक खर्चाची भरपाई करण्यासाठी उद्योग संस्थांची स्वखर्चाने सार्वजनिक दवाखाने, कामगारांसाठी घरे ,वाहतूक, शाळा व महाविद्यालये आणि प्रशिक्षण संस्थांच्या सोई, प्रदूषण आटोक्यात आणण्यासाठी वृक्षलागवड इत्यादी कार्यक्रम हाती घेऊन सामाजिक कल्याणात वाढ केली जाईल .पूर, भूकंप, वादळ, नैसर्गिक आपत्तींच्या काळात आपदग्रस्तांना आर्थिक व तांत्रिक मदत केली पाहिजे.

ग्राहकांना वाजवी किमतीत वस्तूंचा पुरवठा करणे, ग्राहकांचे समाधान हाच नफा हे ध्येय ठेवून ग्राहकांचे हित जपले पाहिजे. श्रमिक हा व्यवसायसंस्थेच्या विकासातील महत्त्वाचा घटक असल्याने श्रमिकांच्या कामाच्या ठिकाणी योग्य आनंददायक वातावरण, आरोग्य, शिक्षण व प्रशिक्षण प्रवास, मनोरंजन व वाचनालयाच्या विमा योजना, भविष्यकालीन योजना,अपघात ग्रस्तांसाठी निधी इत्यादी श्रमिक कल्याणाच्या योजना हाती घेतल्या पाहिजे.

Busi.Economics HRM

3)कर्मचारी ख्यातीमूल्य

Four (4) M

Money

Machin

Material

Men

यामधील कर्मचारी हा व्यवसाय संघटनेतील महत्त्वाचा घटक आहे. व्यवसायसंस्थेची कार्यक्षमता आर्थिक यशापयश प्रगती हे मनुष्यबळावर अवलंबून असते. कर्मचाऱ्यांमध्ये कुशल-अकुशल, अर्धकुशल इत्यादी सर्व कर्मचाऱ्यांचा समावेश होतो. उत्पादनातील इतर घटक निर्जीव असतात. केवळ कर्मचारी हा घटक असतो. व्यवसायसंस्थेच्या उभारणीत वाटचालीस आणि प्रगतीत कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असते. कामगार म्हणजे केवळ उत्पादनाचे साधन किंवा पगारी नोकर नाही, उत्पादन प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक म्हणून कामगारांना वागणूक दिल्यास व कामगारांचे विश्वास संपादन केल्यास त्यांना व्यवसाय संस्थेचे आत्मीयता वाटते. कामगार अधिक अधिक योगदान देतात. कामगारांच्या विश्वास संपादन करण्यासाठी व त्यांचा नावलौकिक वाढवण्यासाठी व्यवसाय संस्थांनी कामगारांना पात्रतेनुसार व कामाच्या स्वरूपानुसार योग्य वेतन दिले पाहिजे. चांगले किंवा उत्कृष्ट काम करणाऱ्या कामगारांना प्रोत्साहनपर बक्षीस दिले पाहिजे. उदाहरणार्थ वेतनवाढ कामगारांकडून चुका होत असल्यास त्यांना सुधारण्यासाठी कौशल्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे.कामगारांच्या तक्रारी, अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारली पाहिजे. कामगारांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी घरांची सुविधा, स्वस्त दराने आवश्यक वस्तू ,वैद्यकीय सुविधा, वाचनालय, क्रीडांगणे, खेळांचे साहित्य या सुविधा उपलब्ध करून दिल्यास कामगारांची मनोवृत्ती

Busi.Economics HRM

प्रफुल्लित व सकारात्मक राहते. कामगारांना व्यवस्थापनात सहभागी करून घेतले व्यवसाय संस्थेच्या बाबतीत आत्मीयता वाटते. ते जबाबदारीने काम करतात औद्योगिक संघर्ष टाळण्यासाठी योग्य यंत्रणा उभारण्यात कामगारांच्या उद्योगसंस्थेविषयी आदरभाव निर्माण होतो. कामगारांना आर्थिक राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य दिले आहेत ते पूर्ण शक्तीनिशी आपले योगदान उद्योगसंस्थेसाठी देतात.

संदर्भसूची

1. **व्यवसायिक अर्थशास्त्र (सूक्ष्म) अथर्व प्रकाशन,डॉ.आर.जी.आघाव,डॉ.टि.जी.गिते,प्रा.आर.डी.जाधवर.2013.**
2. **व्यवसायिक अर्थशास्त्र (सूक्ष्म)निराली प्रकाशन,डॉ.डी.जी.उशीर,डॉ.आर.के.दातीर,एस.आर.जावळे,श्रीमतीबी.डी.पाटील,डॉ.जी.आर.पिंपळे, प्रथमावृत्ती, जुलै 2019.**
3. **सूक्ष्म अर्थशास्त्र(अर्थशास्त्र स्पेशल पेपर 1)डॉ. डी.जी उशीर, डॉ.एस. आर. जावळे ,डॉ. एच.डी आव्हाड ,डॉ. डी .बी. पवार ,निराली प्रकाशन, (सेमिस्टर 3) प्रथमावृत्ती ,जुलै 2020.**

Busi.Economics HRM

Busi.Economics HRM